

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर




## ई मासिक विद्यासंवाद

जानेवारी २०२४|आवृत्ती-०७

# क्रीडा - सांस्कृतिक विशेषांक










विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय। शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन-जय करावया।।

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर

ई मासिक विद्यासंवाद
क्रीडा - सांस्कृतिक विशेषांक

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ १०० शताब्दी वर्ष १९२३ - २०२३

जानेवारी २०२४ | आवृत्ती-०७


मार्गदर्शक
**डॉ. सुभाष चौधरी**
कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**डॉ. संजय दुधे**
प्र-कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

प्रकाशक
**डॉ. राजू हिवसे**
कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

संपादक
**श्री. प्रेमदास वाडकर**
जनसंपर्क अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

मुद्रक
**श्री. प्रवीण गोतमारे**
प्रकाशन अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर




मा. राज्यपाल
**श्री. रमेश बैस**



मा. कुलगुरु
**डॉ. सुभाष चौधरी**



मा. प्र-कुलगुरु
**डॉ. संजय दुधे**



मा. कुलसचिव
**डॉ. राजू हिवसे**





# स्वतःचे अस्तित्व निर्माण करा, देश गौरव करेल

## पद्मश्री डॉ. सुनील दबास यांचे खेळाडूंना आवाहन

## महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवाचे उद्‌घाटन

खेळामध्ये स्वतःचे अस्तित्व निर्माण करा, गावासह नागरिक तुमच्या अस्तित्वाचा गौरव करतील, असे प्रतिपादन भारतीय महिला कबड्डी संघाच्या प्रशिक्षक, पद्मश्री, द्रोणाचार्य व अर्जुन पुरस्कार प्राप्त माजी आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू डॉ. सुनील दबास यांनी केले. रौप्य वर्षीय महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवाचे यजमानपद राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ भूषवित आहे. विद्यापीठाच्या रवी नगर स्थित क्रीडा परिसरात महोत्सवाचा उद्‌घाटन कार्यक्रम शुक्रवार, दिनांक १२ जानेवारी २०२४ रोजी सायंकाळी पार पडला. महोत्सवाचे उद्‌घाटन करताना डॉ. सुनील दबास खेळाडूंना संबोधित करीत होत्या.

आंतरराष्ट्रीय सिंथेटिक ट्रॅक परिसरात आयोजित कार्यक्रमाला आकर्षण म्हणून भारतीय महिला कबड्डी संघाच्या प्रशिक्षक, पद्मश्री, द्रोणाचार्य व अर्जुन पुरस्कार प्राप्त माजी आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू डॉ. सुनील दबास, प्रमुख अतिथी म्हणून माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, निरीक्षक डॉ. मोहन आर्मुळे, डॉ. अनिता लोखंडे, क्रीडा व शारीरिक शिक्षक मंडळ सदस्य डॉ. धनंजय वेळूकर यांची उपस्थिती होती. प्रमुख अतिथी डॉ. सुनील दबास यांनी कबूतर उडवीत स्पर्धेचे उद्‌घाटन झाल्याचे घोषित केले. खेळाडूंना कसे आहात तुम्ही, असा मराठीतून संवाद साधत डॉ. दबास यांनी त्यांच्या भाषणात सुरुवात केली. मनात ठरविले तर कोणीही खेळाडू बनू शकतो. त्यासाठी कठोर मेहनत, सोबतच शिस्तीची आवश्यकता आहे. देशातील प्रत्येक व्यक्ती खेळाडूंकडे पदकांच्या आशेने पाहतो असे, त्या म्हणाल्या. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी हरियाणाच्या ग्रामीण भागातील अशा गावातून महिलांना जेथे विविध बंधनात जीवन जगावे लागते त्या ठिकाणाहून येतात, असे सांगितले. खेळाचा गंध नसलेल्या गावात अनेक संकटांना सामोरे जात कबड्डीचा सराव गावातील नागरिकांच्या लपवून सुरू ठेवला. मात्र, कधीही त्यांचा विरोध पत्करला नाही, असे सांगितले. गावात स्टेडियम नसल्याने १० कि.मी. अंतरावर शहरात सराव केला. सरावाने माखलेल्या कपड्यांवर सलवार सूट घालून गावात परत यावे लागत होते. अशा विपरीत परिस्थितीवर मात करीत २०१० मध्ये आशियाई स्पर्धा जिंकून आल्यानंतर गावातील नागरिक २०० ट्रॅक्टर घेऊन 'मेरी गाव की बेटी' म्हणत दिल्ली विमानतळावर आले होते, असे त्यांनी यावेळी सांगितले. प्रास्ताविक शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी केले. स्वागतपर भाषण करताना प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी महोत्सवात सहभागी सर्व खेळाडूंचे स्वागत केले. अध्यक्षीय भाषण करताना कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी खेळाडूंचे स्वागत करीत विविध स्पर्धेतून जिंकून आलेले तुम्ही खेळाडू असून येथे यश मिळावे अशा शुभेच्छा दिल्या. संचालन डॉ. सोनाली शिरभाते यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले. यावेळी कार्यक्रमाला अधिष्ठाता सर्वश्री डॉ. प्रशांत माहेश्वरी, डॉ. संजय कवीश्वर, डॉ. शामराव कोरेटी, डॉ. प्रशांत कडू, व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. वामनराव तुर्के, अधिसभा सदस्य दिनेश शेराम, डॉ. संजय चौधरी यांच्यासह विविध प्राधिकरणाचे सदस्य विभाग प्रमुख अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

### खेळाडूंचा सत्कार

कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय खेळाडू रितिका ठक्कर, ओजस देवतळे, आल्फिया पठाण, जयंत दुबळे, वैभव श्रीरामे, संजना जोशी, प्रतिक मोपकर यांचा प्रमुख अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी वैद्यकीय व्यवस्थापक डॉ. पिनाक दंदे तसेच प्रहार सैनिकी शाळेचे सूर्यभानजी दाणी यांचा देखील सत्कार करण्यात आला.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला सर्वसाधारण विजेतेपद तर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ उपविजेते

## महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवाचा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

## पुरस्कार विजेत्या सर्व विद्यापीठ संघांचे कुलगुरूंकडून अभिनंदन






राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या यजमानपदाखाली रवी नगर क्रीडा संकुल परिसरात १२ ते १६ जानेवारी २०२४ दरम्यान पार पडलेल्या रौप्यवर्षीय महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवाचा समारोपिय कार्यक्रम मंगळवार, दिनांक १६ जानेवारी २०२४ रोजी सकाळी पार पडला. महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतेपद तर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने उपविजेतेपद पटकाविले. याची घोषणा समारोपिय कार्यक्रमात करण्यात आली. सोबतच पाच खेळ प्रकारातील पुरुष व महिला गटातील विजेत्या संघांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

क्रीडा संकुल परिसरात झालेल्या समारोपिय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी होते, प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरु डॉ संजय दुधे, कुलसचिव डॉ राजू हिवसे, मानव्य विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, पॅरालिम्पियन पॉवर लिफ्टर, अर्जुन व द्रोणाचार्य पुरस्कार्थी श्री. विजय मुनीश्वर, गोंडवाणा विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी डॉ. भास्कर पाठारे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक तथा निरीक्षक डॉ. दीपक माने, मुंबई विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. मोहन आर्मुळे, गोंडवाना विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग संचालक तथा निरीक्षक डॉ. अनिता लोखंडे, माजी क्रीडा संचालक डॉ. धनंजय वेळुकर यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमांमध्ये ॲथलेटिक्स पुरुष गटात विजेते ठरलेले शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, उपविजेते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, तिसऱ्या क्रमांकावर राहिलेले पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, महिला गटात विजेते शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, उपविजेते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, तिसऱ्या क्रमांकावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचा अतिथींच्या हस्ते ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला.

बास्केटबॉल पुरुष गटात विजेतेपद पटकाविलेले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, उपविजेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर, तृतीय स्थानी राहिलेले मुंबई विद्यापीठ तर महिला गटात विजेते मुंबई विद्यापीठ, उपविजेते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, तृतीय स्थानी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचा सत्कार करण्यात आला.

टेबल टेनिस पुरुष गटात विजेते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, उपविजेते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, तिसऱ्या क्रमांकावरील शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर तर महिला गटात प्रथम विजेते एसएनडीटी महिला विद्यापीठ, उपविजेते मुंबई विद्यापीठ तृतीय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचा सन्मान करण्यात आला.

बॅडमिंटन पुरुष गटात विजेते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, उपविजेते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, तृतीय शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर तर महिला गटात विजेते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, उपविजेते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ तर तृतीय शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचा सन्मान करण्यात आला.

व्हॉलीबॉल पुरुष गटात विजेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर, उपविजेते कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ सातारा, तृतीय शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर तर महिला गटात विजेते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, उपविजेते एसएनडीटी महिला विद्यापीठ मुंबई, तृतीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांचा सन्मान करण्यात आला.






उत्कृष्ट पथसंचलनाचा पुरस्कार महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ नाशिकला देण्यात आला. समारोपिय कार्यक्रमात क्रीडा महोत्सवाचे निरीक्षक डॉ. दीपक माने व विद्यापीठाचे माजी क्रीडा संचालक डॉ. धनंजय वेळुकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्षीय भाषण करताना कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य केल्याने धन्यवाद मानले. विजेत्या संघातील तसेच सहभागी सर्व खेळाडूंचे कुलगुरूंनी अभिनंदन केले. यावेळी त्यांनी शताब्दी महोत्सवाच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमांचे आयोजन होत असल्याचे माहिती दिली. पुढील क्रीडा महोत्सवाचे आयोजन करणाऱ्या गोंडवाना विद्यापीठाचे अभिनंदन केले. यावेळी बोलताना निरीक्षक डॉ. दीपक माने यांनी रौप्यवर्षीय क्रीडा महोत्सवात सहभागी होणे जीवनातील सर्वात मोठा क्षण असल्याचे सांगितले आतापर्यंत १७ क्रीडा महोत्सवाचे निरीक्षक पदाची जबाबदारी दिल्याने राज्यपाल कार्यालयाचे त्यांनी आभार व्यक्त केले. मार्गदर्शन करताना द्रोणाचार्य अर्जुन पुरस्कार प्राप्त श्री. विजय मुनेश्वर यांनी महोत्सवाचे उत्कृष्ट आयोजन झाल्याचे सांगितले. सोबतच सर्व खेळाडूंचे अभिनंदन करीत 'खेल खिलाडी खेल' असे आवाहन केले.

यावेळी संघ व्यवस्थापकांच्या वतीने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या डॉ. सीमा देशमुख यांनी तर खेळाडूंच्या वतीने शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरची खेळाडू लीना कोहळे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक करताना विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी क्रीडा महोत्सवाच्या निमित्ताने विविध पायाभूत सुविधा निर्माण झाल्याची माहिती दिली तसेच आयोजन समितीच्या वतीने माननीय कुलगुरू, प्र- कुलगुरू व कुलसचिव यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. सोनाली शिरभाते यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले. यावेळी सदस्य डॉ. मनोज आंबडकर, डॉ. नितीन जंगीटवार,डॉ. विवेकानंद सिंग, डॉ. आदित्य सोनी, डॉ. अर्चना कोट्टेवार यांच्यासह अन्य विविध समित्यांचे सदस्य उपस्थित होते.

## महिला गटात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला उपविजेतेपद
## नेहा ढबाले सर्वोत्कृष्ट ॲथलिट्स
## बास्केटबॉल, टेबल टेनिस स्पर्धेत विद्यापीठाला रौप्यपदक












राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या यजमानपदाखाली सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेतील ॲथलेटिक्स प्रकारात महिला गटातील उपविजेतेपद प्राप्त करण्याचा मान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने पटकाविला. तर महिला गटात सर्वोत्कृष्ट ॲथलिट्स नेहा ढबाले ठरली आहे.

विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकवर सोमवार, दिनांक १५ जानेवारी २०२४ रोजी पार पडलेल्या ॲथलेटिक्स स्पर्धेत महिला गटात ४५ गुणांसह द्वितीय स्थान अर्थात उपविजेतेपद राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने प्राप्त केले. तर विजेतेपद ५३ गुणांसह कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाने आणि ४१ गुणांसह तिसरे स्थान पुणेच्या एसपीपी विद्यापीठाने प्राप्त केले. पुरुष गटात ७१ गुणांसह जेतेपद शिवाजी विद्यापीठाने तर उपविजेतेपद एसपीपीयू पुणे यांनी तिसरे स्थान सोलापूर विद्यापीठाने प्राप्त केले.









स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाने १२४ गुणांसह प्राप्त केले. तर उपविजेतेपद पुणे विद्यापीठाने प्राप्त केले. ७२ गुणांसह तिसरे स्थान रातुम नागपूर विद्यापीठाने प्राप्त केले. स्पर्धेत पुरुष गटात उत्कृष्ट ॲथलिट्सचा मान मुंबई विद्यापीठाच्या निखिल ढाके याने ९६१ गुणांसह प्राप्त केले. तर महिला गटात सर्वोत्कृष्ट ॲथलिट्स होण्याचा मान नागपूर विद्यापीठाच्या नेहा ढबालेने ९३८ गुणांसह प्राप्त केले.

याशिवाय महिलांच्या ४ बाय ४०० मीटर रिले गटात सुवर्णपदक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने प्राप्त केले. भुवनेश्वरी मेश्राम, स्वाती उईके, चैताली बोरीकर, नेहा ढबाले यांचा समावेश असणाऱ्या संघाने ३ मिनिटे ५९.८९अशी वेळ नोंदवली. रौप्य पदक शिवाजी विद्यापीठाच्या संघाने प्राप्त केले. या संघात लीना कोहळे, स्वराली मोहिते, श्रेया जाधव, प्रतीक्षा पटोले यांचा समावेश आहे. कांस्यपदक ४ मिनिट ५.९४ सेकंदासह मुंबई विद्यापीठाच्या संघाने प्राप्त केले. या संघात खुशी हासे, चार्मी पुजारी, आदिती पाटील, गायत्री अरेकर यांचा समावेश आहे. स्पर्धेतील विजेत्यांना सिनेट सदस्य डॉ. पायल ठावरे, बिझनेस मॅनेजमेंटचे एचओडी डॉ. अनंत देशमुख, विद्यापीठ अभियंता नितीन विश्वकर यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी क्रीडा व सर्व शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी उपस्थित होते.

## आदर्श भुरेचे स्पर्धेतील दुसरे सुवर्णपदक

१०० मीटर पुरुषांच्या धावण्याच्या शर्यतीत अपेक्षेप्रमाणे कामगिरी करीत राष्ट्रसंत तुकडोजी नागपूर विद्यापीठाच्या आदर्श भुरेने पहिल्याच दिवशी सुवर्णपदक प्राप्त केले होते. यानंतर स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी आदर्शने २०० मीटर धावण्याचे शर्यतीत जबरदस्त कामगिरी करत स्पर्धेतील दुसरे सुवर्णपदक आपल्या नावे केले. विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणारे आदर्शने पुरुष गटात २०० मीटर अंतराच्या शर्यतीत २१.८० अशी वेळ देत सुवर्णपदक प्राप्त केले. दुसरे स्थान मुंबई विद्यापीठाच्या निखिल ढाकेने २१.८१ सेकंदासह तर तिसरे स्थान शिवाजी विद्यापीठाच्या अजय खाडे याने प्राप्त केले अजयने २२.२० सेकंदाची वेळ नोंदवली.

## बास्केटबॉल, टेबल टेनिस स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला रौप्यपदक

राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवात बास्केटबॉल व टेबल टेनिस प्रकारात नागपूर विद्यापीठ संघाने रौप्यपदक प्राप्त करण्याची कामगिरी केली आहे. महिलांच्या बास्केटबॉल स्पर्धेत अंतिम फेरीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर संघाची लढत मुंबई विद्यापीठ संघासोबत झाली. यात ६३-४१ गुणांनी नागपूर संघाला पराभव स्वीकारावा लागला. परिणामी या संघाने रौप्यपदक पटकाविले.

तर पुरुष गटात टेबल टेनिस स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संघाची अंतिम लढत सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे संघासोबत झाली. यात २-१ अशा गुणांनी नागपूर संघाला पराभव स्वीकारावा लागला. एकेरीत आरुष गलपालीला नागपूरच्या आदी चिटणीस कडून १२-४,६-११,८-११,६-११ असा पराभूत झाला. तर दुहेरीत भार्गव चक्रदेव आणि अद्वैत करमळकर जोडीने आदी आणि जयेश कुळकर्णी ला नमवित सामन्यात १-१ अशी बरोबरी साधली. निर्णायक लढतीत भार्गवने रजत तोरसकरला २-१ गुणांसह नमवित संघाच्या जेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

## मुलींच्या हॉलीबॉल संघाला तिसरे स्थान

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला हॉलीबॉल संघात मुंबई विद्यापीठाचा पराभव करीत तिसरे स्थान पटकावले आहे. हॉलीबॉल स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विजेता तर एसएनडीटी मुंबई विद्यापीठ उपविजेता ठरले आहे. मुलांच्या वॉलीबॉल सामन्यांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर विजयी ठरले दुसऱ्या स्थानी कर्मवीर भाऊराव पाटील सातारा तर तिसऱ्या स्थानी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचा संघ राहिला.



## माजी स्टेट चॅम्पियनमध्ये ऑलिंपिक खेळण्याची जिद्द टेबल टेनिस खेळाडू समृद्धी कुलकर्णी यांची मुलाखत

मुंबईमध्ये झालेल्या पश्चिम क्षत्रिय क्रीडा स्पर्धेमध्ये सुवर्णपदक पटकावणारी तसेच टेबल टेनिस खेळातील मागील वर्षाची स्टेट चॅम्पियन समृद्धी कुलकर्णी हिने आगामी २०२८ मध्ये होणाऱ्या ऑलिंपिक स्पर्धेमध्ये खेळण्याचा मानस व्यक्त केला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आयोजित रौप्यवर्षीय महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत समृद्धी ही एसएनडीटी मुंबई विद्यापीठाचे टेबल टेनिस खेळामध्ये प्रतिनिधित्व करीत आहे. एसएनडीटी मुंबई विद्यापीठाच्या पुणे येथील महाविद्यालयात समृद्धी ही मेडिकल न्यूट्रिशनचे धडे घेत आहे. खेळाचा कौटुंबिक वारसा समृद्धीला मिळाला आहे. तिचे वडील स्वतः खेळाडू असून बहीण, आत्या तसेच आते बहीण देखील खेळाडू असल्याचे गर्वाने सांगते. अगदी शालेय शिक्षणापासूनच तिच्या मध्ये खेळण्याची आवड निर्माण झाली. तिच्या वडिलांनी देखील तिच्या आवडीचे समर्थन करीत टेबल टेनिस खेळाण्यास प्रोत्साहित केले. शालेय स्पर्धेमध्ये १४ वर्षाखालील गटात गुजरात राज्यातील बडोदरा येथे झालेल्या वैयक्तिक गटात कांस्य तर सांघिक गटात सुवर्णपदक प्राप्त केले. २०१५ मधील मच्छलीपट्टणम येथे झालेल्या स्पर्धेत रौप्य, दिल्ली येथे कांस्य तर २०१९, २० आणि २१ मधील शालेय राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सांघिक गटात सुवर्णपदक पटकावले आहे. मुलींनी स्वतः करियर निवडीत स्वावलंबी व्हावे असे परखड मत तिने व्यक्त केले. खेळामध्ये करिअर करीत मुलींनी स्वतःच्या पायावर उभे राहावे आणि स्वतः कुटुंबाचे नाव देखील पुढे नावे असे आवाहन तिने केले. आज सर्वच खेळामध्ये मुली देखील पुढे येत असून मुलांसोबत मुलींच्या खेळामध्ये देखील स्पर्धा असल्याचे ती म्हणाली. स्पेनची बॅडमिंटन खेळाडू कॅरोलिना मारिन हिला समृद्धी आदर्श मानते. ऑलम्पिक खेळण्याचे स्वप्न मनी बाळगून महाविद्यालयीन शिक्षणाची तसेच सरावाची वेळ निश्चित केली आहे. नियमित सराव तसेच मेहनतीनेच मेडल जिंकता येते असे समृद्धीने सांगितले.

क्रीडा महोत्सवाचे उत्कृष्ट आयोजन रौप्यवर्षीय महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवाचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने उत्कृष्ट नियोजन केल्याचे समृद्धी म्हणाली. समृद्धीने यापूर्वी मुंबई येथे झालेल्या पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धा तसेच अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतला आहे. पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत तिने सुवर्णपदक जिंकले तर अखिल भारतीय स्पर्धेत सहभाग नोंदविला. महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ ती प्रथमच सहभागी झाली असून येथील व्यवस्थेबाबत तिने समाधान व्यक्त केले.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची दुसऱ्या दिवशी चार पदकांची कमाई लांब उडी, रिले व ८०० मीटरमध्ये खेळाडूंचे यश राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव



राज्यपाल कार्यालयाच्या पुढाकाराने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या यजमानपदाखाली सुरु असलेल्या रौप्य महोत्सवी राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवातील ॲथलेटिक्स स्पर्धेत दुसऱ्या दिवशीही राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करीत दोन रौप्य व दोन कांस्यपदकासह असे एकूण चार पदके विद्यापीठाला मिळवून दिली. लांब उडी, ८०० मीटर धावणे आणि रिले क्रीडा प्रकारात खेळाडूंनी पदके प्राप्त केली.

रवीनगरातील सिंथेटिक ट्रॅकवर झालेल्या स्पर्धेत महिला गटात लांब उडी प्रकारात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या स्वाती उईकेने ५.४१ मीटरची नोंद करीत रौप्यपदक आपल्या नावे केले.




सुवर्णपदक केबीसीएनए विद्यापीठ जळगावच्या श्वेता ठाकुरने ५.५७ मी. नोंद करीत पटकाविले. तर शिवाजी विद्यापीठाच्या संपदा धमालने ५.३३ मीटरची नोंद देत कांस्यपदक प्राप्त केले.

८०० मीटर महिलांच्या धावण्याच्या शर्यतीत रातुम नागपूर विद्यापीठाच्या गीतल सोनेकरने कांस्यपदक प्राप्त केले. गीतलने २ मि. २८.४२ अशी वेळ नोंदविली. सुवर्णपदक सोलापूरच्या सायली टोणपेने २ मि. २६.९७ अशा वेळेसह तर रौप्यपदक मुंबई विद्यापीठाच्या खुशी हासेने २ मि. २७.५६ अशी वेळ देत प्राप्त केले. महिलांच्या ४ बाय १०० मीटर रिलेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने रौप्यपदक तर पुरुष संघाने कांस्यपदक प्राप्त केले. महिला गटात ५१.१० से. अशी वेळ देत नागपूर संघाने रौप्यपदक प्राप्त केले. विजयी संघात सानिका मंगर, जान्हवी रेवो, धनश्री कामठे, व्ही. नागेश्वरी यांचा समावेश होता. सुवर्णपदक शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर संघाने ४९.६४ सेकंदासह प्राप्त केले. या संघात लीना कोहळे, स्वराली मोहिते, रितीका मगदम, तितिक्षा पटोले यांचा समावेश होता. कांस्यपदक ५२.२५ अशा वेळेसह मुंबई विद्यापीठाच्या गायत्री कासुल्ला, चार्वी पुजारी, आदिती पाटील, गायत्री आरेकर यांचा समावेश असणाऱ्या संघाने प्राप्त केला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरुष संघाने ४४.३१ अशी वेळ देत कांस्यपदक मिळविले. या संघात ऋषिकेश लेंडे, अमन शेंद्रे, पुष्पक उईके, आदर्श भुरे यांचा समावेश होता. सुवर्णपदक शिवाजी विद्यापीठाने ४२.६८ अशी वेळ देत प्राप्त केले. यात अजय खाडे, सार्थक शेलार, अखिलकुमार खोत, ऋषिकेश बागडे यांचा समावेश होता. तर रौप्यपदक ४३.७१ से. अशी वेळ देत पुणे विद्यापीठाने प्राप्त केले. यात समर्थ शिंदे, निखिल आव्हाड, हर्षल बचाव, समित सोरते याचा समावेश होता.

स्पर्धेतील विजेत्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी, नागपूर विद्यापीठाचे विधी सल्लागार ॲड. नितीन खांबोरकर यांच्या हस्ते क्रीडा स्पर्धेचे निरीक्षक डॉ. दीपक माने, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी, मुंबई विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मोहन आमुर्ळे, नागपूर विद्यापीठ शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य डॉ. धनंजय वेरूळकर यांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले.

### व्हॉलीबॉलमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा महिला संघ उपांत्यफेरीत -

व्हॉलीबॉल स्पर्धेत महिलांच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने सर्वच साखळी सामन्यात धडाकेबाज कामगिरी करीत उपांत्यफेरीत धडक दिली आहे. रविवारी झालेल्या सामन्यात रातुम नागपूर विद्यापीठाने परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा विद्यापीठाचा २५-७, २५-१९ ने धुव्वा उडवित उपांत्यफेरीत प्रवेश केला. अ गटात खेळणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने आपल्या गटात अव्वल स्थान प्राप्त केले असून स्पर्धेत पाच पैकी चार लढतीत दिमाखात विजय नोंदविला आहे. तर एका सामन्यात या संघाला पुढे चाल देण्यात आली. सोमवारी नागपूर विद्यापीठ महिला संघाची उपांत्य लढतीत मुंबईच्या एसएनडीटी विद्यापीठासोबत होणार आहे.

### विद्यापीठाचा पुरुष व महिला टेबलटेनिस संघ उपांत्यफेरीत -

राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवात प्रथमच समावेश करण्यात आलेल्या टेबलटेनिस स्पर्धेतही नागपूर विद्यापीठाच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली आहे. रातुम नागपूर विद्यापीठाच्या पुरुष व महिला टेबलटेनिस संघाने स्पर्धेत उपांत्यफेरी गाठली आहे. महिला गटात झालेल्या सामन्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने परभणी विद्यापीठाचा २-० ने पराभव केला. एकेरीत नागपूरच्या अनन्या सकळकळेने मिताली पवारला ११-१,११-२ ने तर अनन्या व दिशा गिरीधरने ऋतुजा व मिताली जोडीचा ११-१, ११-३ ने पराभव करीत उपांत्यफेरी गाठली. पुरुष गटातही राष्ट्रसंत तुकडोजी महाराज  नागपूर विद्यापीठाने परभणी विद्यापीठाला २-० ने नमविले. एकेरीत कौस्तुभ उदारने हर्षवर्धन घाडगेला ११-५, ११-८ ने आणि दुहेरीत कौस्तुभ- आदि चिटणीस जोडीने हर्षवर्धन -सौरभ मस्केचा ११-७, ११-४ ने पराभव करीत संघाला उपांत्यफेरीत पोहचविले.




## लांब उडीत जळगाव तर गोळा फेकमध्ये एचएससीला सुवर्ण

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या यजमान पदासाठी यजमान पदासाठी सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवात लांब उडी प्रकारात जळगाव विद्यापीठाने तर गोळा फेकमध्ये महिला गटात एचएसएनसी विद्यापीठ मुंबईने सुवर्णपदक पटकावले.

लांब उडी प्रकारात पुरुष गटात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा विद्यार्थी शुभम पाटेकर याने ६.९९ मिटर उडी घेत सुवर्णपदक पटकावले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा विद्यार्थी ओमकार शिद्रुक याने ६.६९ मिटर उडी घेत विजय मिळवित रौप्य पदक तर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा विद्यार्थी जीतकुमार पटेल ६.६६ मिटर लांब उडी घेत विजय मिळवित कांस्यपदक प्राप्त केले. महिला गटातील गोळा फेक प्रकारात एचएसएनसी विद्यापीठ मुंबईची हंसिका वसू हिने ११.८० मीटर गोळा फेकत सुवर्णपदक पटकावले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची कोमल वंजारी (११.४३ मी.) तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची सावरी शिंदे (११.१५ मी) हिने कांस्यपदक पटकावले.

## बास्केटबॉल, बॅडमिंटन, व्हॉलीबॉल स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संघाची विजयी सुरुवात महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव




राज्यपाल कार्यालयाच्या पुढाकाराने तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या यजमानपदाखाली सुरु असलेल्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवातील बास्केटबॉल, व्हॉलीबॉल स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला संघाने प्रतिस्पर्धीला नमवित विजयी सुरुवात केली आहे.

रवी नगरातील विद्यापीठाच्या क्रीडा मैदानावर शुक्रवारच्या सकाळच्या सत्रापासूनच बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, टेबलटेनिस स्पर्धेची सुरुवात झाली. बास्केटबॉलच्या सकाळच्या सत्रात झालेल्या सामन्यात कोल्हापुरचे शिवाजी विद्यापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, रातुम नागपूर विद्यापीठ, दापोलीचे डीबीएसकेकेव्ही, केबीपीयू सातारा संघाने महिला गटात प्रतिस्पर्धीला नमवित विजयी सुरुवात केली आहे. सलामीच्या लढतीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने नाशिकच्या एमयूएचएस विद्यापीठाचा ३४-११ अशा गुणांनी पराभव करीत चांगली सुरुवात केली आहे. शिवाजी विद्यापीठाने महात्मा फुले विद्यापीठाला ५४-२० ने अमरावतीच्या संत गाडगेबाबा विद्यापीठाला ५६-२७ अशा गुणांनी तर दापोलीच्या डीबीएसकेकेव्हीने नागपूरच्या माफसूला १२-८ ने तर साताऱ्याच्या केबीपीयूने नांदेडच्या एसआरटीएमयूला ३८-१४ ने मात देत विजयी सुरुवात केली आहे. तर मुलांच्या गटात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सोलापूरच्या पीएएच विद्यापीठाला ५३-१९ ने तर अमरावतीच्या संत गाडगेबाबा विद्यापीठाने ६३-२८ ने गोंडवाना गडचिरोली विद्यापीठाला तर नाशिकच्या वायसीएमएनयूने राहुरीच्या एमपीकेव्हीला ३८-१७ गुणांनी आणि मुंबईच्या एचएसएनसीने नागपूरच्या माफसू विद्यापीठाचा ३३-११ गुणांनी पराभव करीत स्पर्धेत विजयी सुरुवात केली आहे.






व्हॉलीबॉलमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला संघाने सलग दोनवेळा विजय नोंदवित स्पर्धेत धडाकेबाज सुरुवात केली आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने सलामीच्या लढतीत गडचिरोलीच्या गोंडवाना संघाचा २५-१७, २५-८ अशा गुणांनी पराभव करीत विजयी सुरुवात केली. तर दुसऱ्या लढतीत यजमान नागपूर संघाने लोणेरेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाचा सरळ दोन सेटमध्ये २५-३, २५-७ ने पराभव करीत स्पर्धेत पुढील फेरीत प्रवेश केला आहे. इतर सामन्यात मुंबईच्या एचएसएनसी विद्यापीठाला जळगावच्या बहिणाबाई चौधरी विद्यापीठाने २५-०, २५-० ने डॉ. बाबासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोलीचा मुंबईच्या एसएनडीटी महिला विद्यापीठाने २५-१, २५-९ ने, परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने डॉ. आंबेडकर विद्यापीठ लोणेरेचा २५-१०, २५-८ ने मुंबई विद्यापीठाने अकोल्याच्या डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठाचा २५-१४, २५-१० ने संत गाडगेबाबा विद्यापीठाने साताऱ्याच्या कर्मवीर भाउराव पाटील विद्यापीठाचा २५-६, २५-९ ने, नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने रामटेकच्या संस्कृत विद्यापीठाचा २५-०, २५-० ने धुव्वा उडवित विजयी सुरुवात केली आहे.



पुरुष गटात पहिल्याच सामन्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला साताऱ्याच्या कर्मवीर भाउराव पाटील संघाकडून २५-२३, २५-१९ ने पराभव स्वीकावार लागला. इतर सामन्यात पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाने नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाला २५-१२, २५-११ ने कोल्हापुरच्या शिवाजी विद्यापीठाने कोकण कृषी विद्यापीठाचा २५-१२, २५-९ ने मुंबई विद्यापीठाने गोंडवाना विद्यापीठाचा २५-२२, २५-१८ ने नमवित स्पर्धेत विजयी सुरुवात केली.

## ॲथलेटिक्समध्ये पहिल्या दिवशी नेहा, आदर्श, चैतालीचे सुवर्ण यश
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या धावपटूंचे वर्चस्व
## व्ही नागेश्वरीला कांस्यपदक, महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सव

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या यजमानपदाखाली सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेतील ॲथलेटिक्स प्रकारात पहिल्याच दिवशी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे वर्चस्व दिसून आले. तीन सूवर्ण आणि एक कांस्यपदक प्राप्त करीत विद्यापीठाने दमदार सुरुवात केली आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नेहा ढबाले, आदर्श भुरे, चैताली बोरीकर यांनी दमदार कामगिरी करीत सुवर्ण पदक आपल्या नावे केली आहेत.

रवीनगरातील विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅक वर झालेल्या स्पर्धेत मुलींच्या ४०० मीटर धावण्याच्या शर्यतीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या नेहा ढबाले हिने ५७.०६ अशी वेळ देत सुवर्ण पदक प्राप्त केले. रौप्यपदक सोलापूर विद्यापीठाच्या आकांक्षा गावडे हिने तर कांस्यपदक शिवाजी विद्यापीठाच्या तितीक्षा पटोले हिने प्राप्त केले.

शंभर मीटर पुरुषांच्या धावण्याच्या शर्यतीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या आदर्श भुरे ने सुवर्ण पदक प्राप्त केले. आदर्शने १०.८३ अशी वेळ दिली. रौप्यपदक सोलापूर विद्यापीठाच्या विनीत दिनकरने रौप्य आणि कांस्यपदक शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या सागर खाडेने प्राप्त केले. विनीतने १०.८७ तर सागरने १०.९८ अशी वेळ नोंदवली. आदर्शने आपल्या कामगिरीत सातत्य ठेवत हे सुवर्ण पदक आपल्या केले. नुकत्याच पार पडलेल्या अ. भा. आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेत रौप्यपदक प्राप्त करणाऱ्या आदर्शने आपल्या कामगिरीत सुधारणा करीत सुवर्ण पदक मिळविले.

महिलांच्या गटात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या व्ही. नागेश्वरीला कांस्यपदकावरच समाधान मानावे लागले. तिनं १२.९७ अशी वेळ दिली. सुवर्ण पदक मुंबई विद्यापीठाच्या चार्वी पुजारीने १२.७२ अशी वेळ देत बाजी मारली. रौप्यपदक एसएनडीटी मुंबईच्या मंजूषा शेट्टीने १२.८५ अशी वेळ देत प्राप्त केले. पंधराशे मीटर धावण्याच्या शर्यतीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या चैताली बोरीकर हिने अनपेक्षित कामगिरी करीत सुवर्ण पदक आपल्या नावे केले. चैतालीने ४ मिनिटे ५३.३२ सेकंद अशी वेळ देत बाजी मारली. रौप्यपदक एसपीपीव्ही पुण्याच्या वेदश्री लोणारे हिने ४ मिनिटे ५५.३० अशी वेळ देत प्राप्त केले. कांस्यपदक शिवाजी विद्यापीठाच्या पुर्वा शेवाळेने प्राप्त केले. तिने ४ मिनिटे ५६.९७ अशी वेळ दिली.
स्पर्धेतील विजेत्यांना भारतीय महिला हॉकी संघाची माजी कर्णधार आणि अर्जुन पुरस्कारथी मधू यादव, डॉ. मोहन आमुर्ले यांच्या हस्ते तसेच विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांच्या उपस्थितीत पदक देऊन गौरविण्यात आले.










# शतस्पंदन' युवा महोत्सवाचा थाटात शुभारंभ

## मिरवणुकीतून विद्यार्थ्यांनी सादर केली सांस्कृतिक कला सर्वोत्कृष्ट कला सादर करा - डॉ. सुभाष चौधरी

पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव 'शतस्पंदन' चा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात थाटात शुभारंभ झाला आहे. शतस्पंदन युवा महोत्सवाचा उद्घाटनिय कार्यक्रम विद्यापीठाच्या महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरात सोमवार, दिनांक २२ जानेवारी २०२४ रोजी सायंकाळी पार पडला. तत्पूर्वी महाराष्ट्र व गुजरात राज्यातील विविध विद्यापीठातून आलेल्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कलांच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. यावेळी उद्घाटनिय कार्यक्रमात माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी सर्वोत्कृष्ट कला सादर करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

उद्घाटनिय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी होते. प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, निरीक्षक डॉ. एस. के. शर्मा, डॉ. दीपक झा, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. मंगेश पाठक यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषण करताना कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी विद्यापीठाला १०० वर्ष पूर्ण झाल्याने विविध कार्यक्रमाचे आयोजन केल्याची माहिती दिली. युवा महोत्सवामध्ये सहभागी सर्व कलावंत विद्यार्थ्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक करताना विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. मंगेश पाठक यांनी 'शतस्पंदन' युवा महोत्सव कार्यक्रमाच्या आयोजनाची माहिती दिली. निरीक्षक डॉ. एस. के. शर्मा यांनी मार्गदर्शन करताना या युवा महोत्सवातून प्रथम द्वितीय आणि तृतीय येणाऱ्या संघाला पंजाबमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी सहभाग घेता येणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन प्रकाश शुक्ला यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले. यावेळी कार्यक्रमाला व्यवस्थापन परिषद सदस्य सर्वश्री डॉ. अजय अग्रवाल, डॉ. योगेश भुते, डॉ. पांडुरंग डांगे, अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांची उपस्थिती होती.

### महाराष्ट्रीयन संस्कृती', राम-सीतेच्या झाकीने वेधले लक्ष

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या परिसरात आजपासून 'शतस्पंदन' या ३७ व्या पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ युवा महोत्सवास सुरुवात झाली आहे. युवा महोत्सवाच्या उद्घाटनापूर्वी सहभागी विद्यापीठातील विद्यार्थ्यांकडून मिरवणूक काढण्यात आली. महाराष्ट्रातील विविध भागातून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रीय संस्कृतीचे दर्शन त्यांनी सादर केलेल्या झाकींमधून घडविले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे भजन, नागपुरातील शेर, काळी- पिवळी मार्बत, रामटेक आदी विविध झाकी सादर केली. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या विद्यार्थ्यांनी खंडोबा, वाघ्या मुरळी, पोवाडा, कुस्ती, लावणी, लेझीम, मैदानी खेळ, राजमाता जिजाऊ, राजश्री शाहू महाराज आदी विविध झाकी सादर केली. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी संत गाडगेबाबा, राम-सीता- लक्ष्मण यांची झाकी प्रस्तुत केली. गुजरात राज्यातील एल.जे. विद्यापीठ अहमदाबाद, निरमा विद्यापीठ, पारुल विद्यापीठ, हेमचंद्र आचार्य नॉर्थ गुजरात विद्यापीठ यांनी तेथील गरबा नृत्याचे सादरीकरण केले. पारुल विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांमधील विदेशी विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.


37th Inter University West Zone Youth Festival
Shataspandan
Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur
37th Inter University West Zone Youth Festival
Shataspandan
Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur
37th Inter University West Zone Youth Festival
Shataspandan




# तरुणाईने फुलली संत्रानगरी
## शतस्पंदन पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात ३७ वा पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ 'शतस्पंदन' युवा महोत्सव सुरू आहे. या युवा महोत्सवात महाराष्ट्र गोवा व गुजरात राज्यातील एकूण ३३ विद्यापीठांचे संघ सहभागी झाले आहे. शतस्पंदनच्या निमित्ताने तब्बल बाराशे विद्यार्थी नागपूरात आले असल्याने संत्रा नगरी तरुणाईने फुलून गेली आहे. विद्यापीठाच्या शताब्दी वर्षानिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरात मुख्य कार्यक्रम स्थळ, गुरुनानक भवन, जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, त्याचप्रमाणे गणित विभागातील श्रीनिवास रामानुजन हॉल येथे विविध स्पर्धा होत आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने विविध विद्यापीठांमधून आलेले विद्यार्थी विद्यापीठाच्या परिसरात स्पर्धेकरिता तयारी करताना दिसून येत आहे. एकमेकांशी आपले अनुभव कथन करीत आहे.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी मुख्य कार्यक्रम स्थळी वन ॲक्ट प्ले, गुरुनानक भवन येथे क्लासिकल व्होकल सोलो लाईट व्होकल सोलो, जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहातील तळमजल्यावरील सभागृहात वादविवाद स्पर्धा आणि प्रश्नमंजुषा स्पर्धा पार पडली. तर तिसऱ्या माळ्यावर ऑन स्पॉट पेंटिंग, कोलाज, पोस्टर मेकिंग तर रामानुजन हॉल येथे वेस्टर्न व्होकल व वेस्टर्न इन्स्टुमेंटल सोलो स्पर्धा पार पडली.







# पारंपरिक वाद्य तालात रंगली मैफिल - पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव




राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात सुरू असलेल्या ३७ व्या पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ 'शतस्पंदन' युवा महोत्सवात पारंपारिक वाद्य तालांची मैफिल रंगली. शतस्पंदन युवा महोत्सवाच्या पहिल्या दिवशी सोमवारी (२२ जानेवारी) रात्री विविध विद्यापीठांच्या संघातील विद्यार्थ्यांनी पारंपारिक वाद्य वाजवीत 'लोक कला आर्केस्ट्रा' सादर केला.

खंजिरी, तबला, मृदुंग, ड्रम, ढोल, टाळ, ढोलकी, चोणके यासह स्थानिक परिसरातील वाद्याची साथ घेत विद्यार्थ्यांनी युवा महोत्सवाची रंगत वाढविली. लोक कला आर्केस्ट्रा स्पर्धेमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ सातारा, भारती विद्यापीठ पुणे, गुजरात टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी अहमदाबाद, महाराजा कृष्णकुमारसिंहजी भावनगर विद्यापीठ भावनगर, पारुल विद्यापीठ वडोदरा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती, सरदार पटेल विद्यापीठ आनंद गुजरात, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, मुंबई विद्यापीठ मुंबई आदी विद्यापीठांच्या संघांनी सहभाग घेतला. विविध वाद्यांच्या सहाय्याने लोककला आर्केस्ट्रा सादर करीत विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली.




# कौटुंबिक नात्यातील दुरावा दर्शवतो 'एक्सपायरी डेट'

आधुनिक काळामध्ये तंत्रज्ञानाचा झपाट्याने विकास होत असला तरी कौटुंबिक नात्यांमध्ये देखील दुरावा निर्माण होत असल्याचे सामाजिक चित्र आहे. कौटुंबिक नात्यांमध्ये आलेला दुरावा 'एक्सपायरी डेट' या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या एकांकिकेमधून दर्शविण्यात आला. 'एक्सपायरी डेट' या एकांकिकेने प्रेक्षकांची चांगलीच दाद मिळविली.

मुले शिकून विदेशात जातात. त्यानंतर मात्र कौटुंबिक नाते जपण्यात काही वेळ त्यांना मिळत नाही. वृद्ध आई-वडिलांना एकटे सोडून त्यांच्या मृत्यूचा अर्थात 'एक्सपायरी डेट'चा कसा इव्हेंट केला जातो. याचे भावस्पर्शक सादरीकरण या एकांकिकेमधून करण्यात आले आहे. मुलगा विदेशातूनच आपल्या आई-वडिलांची भविष्यातील मृत्यूची काळ वेळ आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे माहिती करण्याचा प्रयत्न करतो. मृत्यूची काळ-वेळ निश्चित झाली की आपल्याला येता येईल, असा मुलाचा समज असतो. या एकांकिकेत नेहरू नामक पात्राची एक्सपायरी डेट ही १४ ऑगस्टच्या रात्री असते. या एक्सपायरी डेट च्या निमित्ताने विविध इव्हेंट कसे केले जातात याचे देखील सादरीकरण यात करण्यात आले. मुलगा विदेशातून येतो, मृत्यूच्या निश्चित वेळेस त्याच्या वडीलास केवळ अस्वस्थ वाटते. 'एक्सपायरी डेट' नंतर देखील वडिलांना जिवंत बघून मुलगा वैतागून निघून जातो. यानंतर पती पत्नी हेच एकमेकाचे अंतिम साथीदार असल्याचे सुंदर सादरीकरण यात करण्यात आले. या एकांकिकेमध्ये ब्रायन डोंगरदिवे, सिफा अन्सारी, जयंत कुरजेकर, नितीन मरसकोल्हे, वेदश्री राजुरकर, गायत्री श्रृंगारपूरकर, हर्ष दयारामानी यांनी अभिनय केला आहे. एकांकिकेचे दिग्दर्शन सारंग गुप्ता व जय गाला यांनी केले तर संगीत मोहित सरकार यांनी दिले आहे.




# दिल धडकने का सबब.. याद आया विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गझलांनी श्रोते मंत्रमुग्ध

## शतस्पंदन पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात ३७ वा पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव सुरू आहे. युवा महोत्सवात विविध राज्यातील विद्यापीठांमधून आलेले विद्यार्थी त्यांच्या कलागुणांची उधळण करताना दिसून येतात. गुरुनानक भवन येथे मंगळवारी रात्री विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गझलांची मैफिल रंगली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाप्रकारास उपस्थित त्यांनी देखील उत्स्फूर्तपणे टाळ्यांनी साथ दिली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची तेजस्विनी सुनील खोडतकर हिने 'वही आज सितारे तराशते थे' ही गझल सादरकरीत उपस्थितांची दाद मिळविली. त्याचप्रमाणे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या विद्यार्थ्यांने 'दिल धडकने का सबब याद आया' वो तेरी याद थी अब याद आया, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांने 'दिल है दुखाने के लिए', संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांने 'तेरी यादो की तनहाओ में', डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर येथील विद्यार्थिनीने 'मै खयाल हू किसी और, का सोचता कोई और है' अशा एकापेक्षा एक गझल सादर केल्या.

एकल शास्त्रीय संगीत प्रकारामध्ये भारतीय विद्यापीठ पुणे येथील भक्ती सुनील पवार, गुजरात तंत्रज्ञान विद्यापीठ आमदाबाद येथील मित्सु दिवेश भट्ट, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथील गायत्री लक्ष्मण थिपे, विश्वकर्मा विद्यापीठ पुणे येथील अमन रायथाथा, ॲटलास स्किल तंत्रज्ञान विद्यापीठ मुंबई येथील अनू नवघरे, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टीचर एज्युकेशन गांधीनगर येथील कंदर्प पवनकुमार शुक्ला,



कर्मवीर भाऊराव पाटील सातारा येथील श्रुतिका श्रीहरी पुजारी, सुदर्शन मच्छिंद्रनाथ नलावडे, एसएनडीटी विद्यापीठ मुंबई येथील प्राजक्ता महादेव शेंद्रे, सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे अभयसिंग चंद्रकांत वाघचौरे, महाराजा कृष्णकुमारसिंहजी भावनगर विद्यापीठ भावनगर येथील ईशा मनीषभाई दवे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील श्री अशोक सिंग भक्ती, हेमचंद्राचार्य नॉर्थ गुजरात विद्यापीठ पटन गुजरात येथील मयूर मुकेशभाई दवे, सरदार पटेल विद्यापीठ आनंद येथील सर्जन शांतीलाल बरिया, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची तेजस्विनी सुनील खोडतकर, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील कल्याणी बाबुराव गायकवाड, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर येथील निषाद प्रमोद व्यास, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील अभिरूप रमाकांत पैंजाने, निरमा विद्यापीठ अहमदाबाद येथील हर्द मेहता, वत्सल उपाध्याय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर येथील आरोही अमोल मंडलिक यांनी सादरीकरण केले.







## शास्त्रीय नृत्यातून भारतीय संस्कृतीचे दर्शन
## शतस्पंदन पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात सुरू असलेल्या शतस्पंदन या पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ युवा महोत्सवात शास्त्रीय नृत्यातून विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविले. विद्यापीठाच्या गुरुनानक भवन येथे शास्त्रीय नृत्य बुधवार,दिनांक २४ जानेवारी २०२४ रोजी पार पडले.डी. वाय. पाटील विद्यापीठ नवी मुंबई येथील विद्यार्थिनी स्नेहा रेड्डी हिने 'दशअवतार पदम' कला प्रकारातून नारायणाच्या नऊ अवतारांचे तिच्या नृत्यातून सादरीकरण केले. सरदार पटेल विद्यापीठ आनंद गुजरात येथील विद्यार्थिनी खुशाली सुतार हिने वर्णम हा नृत्य प्रकार सादर केला. त्याचप्रमाणे या स्पर्धेमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी विद्यापीठ सोलापूर येथील तेजस्विनी संजय बनसोडे, शरयू सुधीर देशमुख, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील ऋचा कुलकर्णी, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची विद्यार्थिनी वैदेही अतुल काकडे, भारती विद्यापीठ पुणे येथील समृद्धी प्रतीक चव्हाण, गुजरात विद्यापीठ अहमदाबाद येथील भगवत प्रजापती, निरमा विद्यापीठ गुजरात येथील वैष्णवी संगानी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टीचर एज्युकेशन गांधीनगरचे केतनभाई दाधानिया पाल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर येथील प्राजक्ता राजकुमार सांगोळे, सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे येथील मिताली नितीन काळे, गुजरात तंत्रज्ञान विद्यापीठ अहमदाबाद येथील आर्ची नवीनचंद्र पटेल, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची कामाक्षी किशोर हम्पीहोली, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेकची शायरीप्रिया प्रकाश मेघे, पारुल विद्यापीठ वडोदरा येथील इंदू वर्मा, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील हिमानी संजय महाजन, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील केदार सदानंद गुरव, मुंबई विद्यापीठाची ऋतुजा संतोष शिंदे, वीर नर्मदा दक्षिण गुजरात विद्यापीठ सुरत येथील राधा अजितसिंह गधवी, भक्त कवी नरसिंह मेहता विद्यापीठ जुनागढ गुजरात येथील ध्रुव देवांगभाई त्रिवेदी, एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ पुणे येथील मोमिता मुखर्जी आदी विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले.





# मातीने घडवले कुस्तीचे डावपेच

## शतस्पंदन पश्चिम क्षेत्रीय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात 'शतस्पंदन' ३७ वा पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव सुरू आहे. युवा महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी बुधवार दिनांक 24 जानेवारी 2024 रोजी विविध विद्यापीठांमधून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी 'क्ले मॉडलिंग' स्पर्धेत हुबेहूब कुस्तीचे डावपेच साकारले आहे.

जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील तिसऱ्या माळ्यावर क्ले मॉडलिंग स्पर्धा पार पडली. विद्यार्थ्यांना या स्पर्धेकरिता कुस्ती हा विषय देण्यात आला होता. यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून निर्मल राजू प्रजापती, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ सातारा येथून अभिषेक विकास कुंभार, भक्त कवी नरसिंह मेहता विद्यापीठ जुनागढ गुजरात येथून प्रतीक प्रकाशभाई कंभारिया, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर येथून मनीष मेघशाम कोडघ्याले, गणपत विद्यापीठ मेहसाणा येथून आयुषी कुमारी, गुजरात तंत्रज्ञान विद्यापीठ अहमदाबाद येथून हर्ष रघुनाथ कदम, गुजरात विद्यापीठ अहमदाबाद येथून हिरल प्रदीपभाई प्रजापती, हेमचंद्राचार्य नॉर्थ गुजरात विद्यापीठ पठण येथून सकीनाबेन हिराभाई भारडा, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टीचर एज्युकेशन गांधीनगर येथून शिवानी कीर्तीभाई सोमपुरा, कवयित्री बहिणाबाई चौधरी नॉर्थ महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथून देवा सुभाष सपकाळे, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक येथून शुभम श्याम जोशी, महाराजा कृष्णकुमारसिंहजी भावनगर विद्यापीठ भावनगर येथून केयूर भारतभाई सोलंकी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातून प्रतीक हनुमंत तांडले, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथून आदित्य संतोष वरणकर, सरदार पटेल विद्यापीठ आनंद येथून लीला रमेशभाई कुमावत, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथून गुरुनाथ सतप्पा मातुगडे, एसएनडीटी मुंबई येथून साक्षी रमेश पलसमकर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथून शिवानी ढोरे, मुंबई विद्यापीठातून सुयोग चंद्रकांत रहाटे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी येथून प्रीती वेन्नेला लावूदिया यांचा सहभाग होता.

### कार्टूनिंग मधून मांडले समाज वास्तव

याच ठिकाणी कार्टूनिंग स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांनी समाजातील वास्तव त्यांच्या कुंचल्यातून साकारले. सोबतच वर्तमान काळात घडत असलेल्या विविध घडामोडींवर लक्ष केंद्रित करत विद्यार्थ्यांनी चित्र काढले. यामध्ये भक्त कवी नरसिंग मेहता विद्यापीठ जुनागड गुजरात येथून निराली बाबुभाई छैया, भारती विद्यापीठ पुणे येथून अखिलेश आत्माराम परब, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर येथून भाग्यश्री मल्हारीकांत देशमुख, गणपत विद्यापीठ मेहसाणा येथून प्रिन्सकुमार किरणभाई सुतार, गुजरात तंत्रज्ञान विद्यापीठ अहमदाबाद येथून हर्ष रघुनाथ कदम, गुजरात विद्यापीठ येथून मिहीर गज्जर, हेमचंद्राचार्य उत्तर गुजरात विद्यापीठ पाटण येथून निखिल शैलेशभाई मोदी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टीचर एज्युकेशन गांधीनगर येथून बी. विद्याश्री, गांधीनगर गुजरात येथून विरलबेन अराशीभाई परमार, कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथून वासुदेव नरेंद्र पाटील, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक येथून समृद्धी चंद्रकांत वारले, महाराज कृष्णकुमारसिंहजी भावनगर विद्यापीठ भावनगर येथून जय माथूरभाई बरैय्या, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर येथून मेघा अशोक कुनी, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातून आदित्य संतोष वरणकर, सरदार पटेल विद्यापीठ आनंद येथून कृष्णाबेन उदाभाई सोलंकी, सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे येथून स्वर्ण मोहन पाटील, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथून गुरुनाथ सातप्पा मातुगडे, एसएनडीटी मुंबई येथून राशेल मासीन, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथून संजय बालकृष्ण भरडे, मुंबई विद्यापीठातून आकाश दिलीप स्थूल तर वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी येथून सिद्धी देसाई यांनी सहभाग घेतला.




## 'विकसित भारत २०४७' रंगला वादविवाद

### शतस्पंदन पश्चिम क्षेत्रीय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात सुरू असलेल्या ३७ व्या पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव 'शतस्पंदन'मध्ये 'विकसित भारत २०४७' या विषयावर वादविवाद स्पर्धा रंगली. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भावनातील सभागृहात वादविवाद स्पर्धा पार पडली.

भारताच्या स्वातंत्र्याला २०४७ मध्ये शंभर वर्ष पूर्ण होणार आहे. शंभर वर्ष पूर्ण होत असताना भारत विकसित देश म्हणून पुढे येईल किंवा हे एक स्वप्नच राहील. या विषयाच्या अनुषंगाने स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी परखडपणे त्यांची मते व्यक्त केली. भारताचे यशस्वीपणे राबविलेला चंद्रयान ३ टप्पा, आदित्य एल १ चे परीक्षण, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा वाढलेला गौरव, G-20 ची अध्यक्षता करीत भारताला विकसित देश बनविण्याच्या दृष्टीने अग्रेसर करीत आहे. तर दुसरीकडे सर्व सामान्य नागरिकांच्या समोर अनेक समस्या उभ्या आहेत. अन्न, आरोग्य, शिक्षण आदी मूलभूत सुविधांपासून देखील देशातील नागरिक कोसो दूर आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर होत असलेल्या या प्रयत्नांमुळे देशाचा विकास होत असला तरी जनतेचा विकास होत २०४७ पर्यंत भारत विकसित देश कसा बनेल, याबाबत विद्यार्थ्यांनी मते व्यक्त केली.






## इस मिट्टी की शान है अलग

### समूह गान स्पर्धेतून विद्यार्थ्यांनी जागवली देशभक्ती

### शतस्पंदन पश्चिमक्षेत्रियआंतर विद्यापीठ युवा महोत्सव

वतन है आत्मा अपनी', 'वतन है तो जमाना है', 'इस मिट्टी की शान अलग' त्याच प्रमाणे 'भारत हमारा जा से प्यारा है' अशा एकापेक्षा एक सरस समूह गान स्पर्धेतून विद्यार्थ्यांनी देशभक्ती जागवली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर गीतांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरात सुरू असलेल्या ३७ वा पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव शतस्पंदनाचा परिसर देशभक्तीने प्रफुल्लित झाला.

बहिण कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावच्या विद्यार्थ्यांनी 'वतन का है आत्मा अपना' उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. गुजरात तंत्रज्ञान विद्यापीठ गुजरात, भक्त नरसिंह दास मेहता विद्यापीठ जुनागड येथील विद्यार्थ्यांनी गुजरात राज्यातील लोकगीत सादर केले. एसएनडीटी मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थिनींनी 'भारत हमारा जहासे प्यारा वतन' गीत सादर करीत देशभक्तीचे वातावरण निर्माण केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी 'ए मेरे प्यारे वतन' प्रस्तुत केले. तसेच कव्वालीच्या सुरात पोवाड्याचे सूर सादर करीत एक अनोखा प्रयोग यावेळी प्रदर्शित केला.




## चार रंगात रंगवली विकसित भारताची लोक संकल्पना

### शतस्पंदन पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आयोजित ३७ व्या 'शतस्पंदन' पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ युवा महोत्सवात विकसित भारताची लोक संकल्पना विद्यार्थ्यांनी रांगोळीतून साकारली. युवा महोत्सवात गुरुवार, दिनांक २५ जानेवारी २०२४ रोजी जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील तिसऱ्या माळ्यावर रांगोळी स्पर्धा पार पडली.

पश्चिम क्षेत्रीय आंतर विद्यापीठ युवा महोत्सवात सहभागी विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर रांगोळी काढून स्पर्धेत रंगत आणली. भारताचा विकास अन् लोक संस्कृतीचे दर्शन घडविणारी संकल्पना रांगोळीतून साकारली. वारली कला, पर्यावरण आणि पांडूरंगाची प्रतिकृती साकारली. रंगांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपली रचना प्रस्तुत करताना संस्कार भारती रांगोळी देखील काढली. या स्पर्धेमध्ये केवळ चार रंगाचा उपयोग करून विद्यार्थ्यांना रांगोळी काढणे बंधनकारक होते. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ सातारा येथून अभिषेक विकास कुंभार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर येथून राहुल रमेश वाघ, गणपत विद्यापीठ मेहसाणा गुजरात येथील मानसीबेन जनाभाई वसावा, गुजरात तंत्रज्ञान विद्यापीठ अहमदाबाद येथून खुशी लता, हेमचंद्राचार्य नॉर्थ गुजरात विद्यापीठ पटन गुजरात येथील पार्थ सुरेशभाई जोशी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टीचर एज्युकेशन गांधीनगर येथून जान्हवी जमनभाई कमानी, कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथून समय अजय चौधरी, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक येथून एकता सिद्धार्थ गजभिये, महाराजा कृष्णकुमारसिंहजी भावनगर विद्यापीठ येथून केयूर भारतभाई सोलंकी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर येथील मेघा अशोक कुनी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथून वैष्णवी शिरभाते, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथून प्रगती सतिश सुदा, सरदार पटेल विद्यापीठ आनंद येथून विरल अमृतभाई थेसिया, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथून कल्याणी रविंद्र बागुल, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील सुचिता भिकाजी तर्लेकर, एसएनडीटी मुंबई येथील प्रणिता प्रदीप शिंदे व वैष्णवी सुरेश मुंदेकर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील वैष्णवी कडवाडे, मुंबई विद्यापीठ येथून अक्षय शिवाजी वहालकर, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी येथून धनश्री कचरे यांनी सहभाग घेतला.




## साईराम अय्यरच्या सुरावर थरकली तरुणाई - पारुल विद्यापीठ वडोदरा ठरले सर्वसाधारण विजेते

### शतस्पंदन पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव

सुप्रसिद्ध गायक साईराम अय्यरच्या सुरावर 'शतस्पंदन' या पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ युवा महोत्सवात सहभागी तरुणाई थिरकली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आयोजित युवा महोत्सवाचा समारोप शुक्रवार, दिनांक २६ जानेवारी २०२४ रोजी झाला. या व्यासपीठाला सहज घेऊ नका. येथून तुम्ही उंची गाठू शकता, ते तुमच्यावर अवलंबून आहे असे आवाहन त्यांनी सहभागी विद्यार्थ्यांना केले. पारुल विद्यापीठ गुजरात संघाने स्पर्धेतील सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. मुंबई विद्यापीठाने दुसरे तर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने तिसरे, पुणे विद्यापीठ चौथे तर एसएनडीटी महिला विद्यापीठाने पाचवे स्थान पटकावले.

समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी होते. यावेळी प्रमुख आकर्षण म्हणून प्रसिद्ध गायक साईराम अय्यर, प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, निरीक्षक डॉ. एस. के. शर्मा, दीपक झा, विद्यार्थी विकास संचालक डॉ. मंगेश पाठक, माजी संचालक डॉ. अरूण पाटील यांची उपस्थिती होती. पुरुष व महिलेच्या आवाजात गाणे गाण्याची कला अवगत असलेले साईराम यांनी त्यांच्या सादरीकरणाने विद्यार्थ्यांमध्ये चैतन्य निर्माण केले. लता मंगेशकर यांच्या आवाजातील सादर केलेल्या वंदे मातरम, ऐसी दिवानगी..., तुम मिले..., चुरा लिया है... या गाण्यांवर तरुणाई थिरकली. १०० वर्षे पूर्ण केलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने शिक्षण, संस्कृती आणि परंपरा टिकविण्याचे कार्य केले. विद्यापीठाने जी दिव्य ज्योत जागवली आहे, ती जळवत ठेवणे. परंपरा जिवंत ठेवणे आपले दायित्व असल्याचे साईराम म्हणाले. नागपूर येथून बरेच काही शिकायला मिळाले असे साईराम यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी विजेते व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. युवा महोत्सव शांततेत पार पाडल्याबाबत विद्यार्थ्यांचे आभार मानले. निरीक्षक डॉ. एस.के. शर्मा यांनी मनोगत व्यक्त करताना 'जिंदगी नीत है, कदम बढाना सीखले, जिंदगी जीत है, हार पचाना सीख ले' असे म्हणत येथून यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना २८ मार्च रोजी लुधियाना पंजाब येथे होणाऱ्या राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक संचालक डॉ. मंगेश पाठक यांनी केले. पुरस्कार वितरणाचे संचालन श्री दीपक शुक्ला यांनी तर कार्यक्रमाचे संचालन दिपाली टेकाम यांनी केले.

## विद्यार्थ्यांचा जल्लोष

कार्यक्रमात पुरस्काराची घोषणा होताच संबंधित विद्यापीठाचे विद्यार्थी त्यांच्याकडील वाद्य वाजवीत जल्लोष करीत होते. सुरुवातीला प्रमुख अतिथींच्या हस्ते सर्वसाधारण विजेतेपद पटकाविणारा पारुल विद्यापीठ वडोदरा, दुसऱ्या क्रमांकावरील मुंबई विद्यापीठ मुंबई, तिसरे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, चौथे पुणे विद्यापीठ तर ५ वे स्थान पटकावणाऱ्या एसएनडीटी विद्यापीठाचा ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला.

ललित कला प्रकारात सर्वसाधारण विजेतेपद मुंबई विद्यापीठाने द्वितीय स्थान पारुल विद्यापीठ वडोदरा, तृतीय स्थान कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने पटकावले. साहित्यिक कला प्रकारात गुजरात तंत्रज्ञान विद्यापीठाने प्रथम, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने द्वितीय तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने तृतीय स्थान प्राप्त केले. संगीत कला प्रकारात प्रथम स्थान पारुल विद्यापीठ वडोदरा, द्वितीय स्थान मुंबई विद्यापीठ मुंबई तर तृतीय स्थान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पटकावले. नृत्य कला प्रकारात प्रथम स्थान भारती विद्यापीठ पुणे द्वितीय स्थान पारुल विद्यापीठ वडोदरा तर तृतीय स्थान एसएनडीटी महिला विद्यापीठाने पटकावले. थिएटर प्रकारात प्रथम स्थान पारुल विद्यापीठ वडोदरा, द्वितीय स्थान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ तर तृतीय स्थान महाराजा कृष्णकुमारसिंहजी भावनगर विद्यापीठाने पटकावले. उत्कृष्ट झाकीचा प्रथम पुरस्कार शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, द्वितीय मुंबई विद्यापीठ, तृतीय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, चतुर्थ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ तर पाचवा क्रमांक पारुल विद्यापीठ वडोदराने पटकावला. यासह प्रश्नमंजुषा, स्वयंस्फूर्त भाषण, वादविवाद, शास्त्रीय नृत्य, लोकनृत्य, मिमिक्री, माईम, स्किट, ऑन स्पॉट पेंटिंग, कोलाज, पोस्टर मेकिंग, क्ले मॉडलिंग, कार्टूनिंग, रांगोळी, स्पॉट फोटोग्राफी, इन्स्टॉलेशन, मेहंदी, शास्त्रीय गायन, पाश्चिमात्य गायन, समूहगान (भारतीय), समूहगान (पाश्चिमात्य), लोककला आर्केस्ट्रा आदी विविध स्पर्धांमधील विजेत्या पाच संघांना पुरस्कृत करण्यात आले.









## विद्यार्थ्यांचे ॲटीट्यूड दर्शविणारे स्किट
### शतस्पंदन पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव

'व्यक्ती तशा वल्ली' या उक्तीप्रमाणे विद्यार्थ्यांनी देखील त्यांचे 'ॲटीट्युड' दर्शवणारे स्किट 'शतस्पंदन' या पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ युवा महोत्सवात सादर केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरात २२ ते २६ जानेवारी पर्यंत युवा महोत्सव आयोजित आहे. या युवा महोत्सवात विद्यार्थ्यांकडून विविध कलांचे सादरीकरण केले जात आहे.

स्किट (प्रहसन) प्रकारात विद्यार्थ्यांनी कॉमन मॅन, आवाज, महिला अत्याचार, ॲटीट्यूड आदी विविध विषय हाताळत सादरीकरण केले. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणीच्या विद्यार्थ्यांनी स्किट मधून सामान्य माणसाची व्यथा मांडली. पारुल विद्यापीठ वडोदरा गुजरात येथील विद्यार्थ्यांनी महिला अत्याचार तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी 'आवाज' स्किट सादर केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी व्यक्ती व्यक्तींमधील 'ॲटीट्यूड' त्यांच्या सादरीकरणातून प्रस्तुत केले.




## गुगलच्या जगात शाश्वत विकासावर काम करा
## कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी यांचे ग्रंथपालांना आवाहन
### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात राष्ट्रीय ग्रंथालय परिषद

ग्रंथपालांनी गुगलच्या जगात शाश्वत विकासावर कार्य करावे, असे आवाहन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी केले. 'भारतीय ज्ञान प्रणालीचे जतन व एनईपी २०२० नुसार ग्रंथालयांच्या भविष्यांची रचना करणे' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे ज्ञान स्त्रोत केंद्र आणि ग्रंथालय भारती नागपूर महानगर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील डॉ. ए. के. डोरले सभागृहात शनिवार, दिनांक २० जानेवारी २०२४ रोजी पार पडलेल्या परिषदेच्या समारोपिय कार्यक्रमात डॉ. चौधरी मार्गदर्शन करीत होते.

ग्रंथालय राष्ट्रीय परिषदेला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ राजू हिवसे, ग्रंथालय भारतीचे अध्यक्ष डॉ. राजशेखर बालकर, बीजभाषक उस्मानिया विद्यापीठ हैदराबादचे ग्रंथपाल डॉ. ए. एस. चक्रवर्ती, शिक्षण मंच अध्यक्ष डॉ. कल्पना पांडे, डॉ. विनय पंडे, विद्यापीठ ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. विजय खंडाळ यांची उपस्थिती होती. कुलगुरू डॉ.सुभाष चौधरी यांनी पुढे बोलताना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शिक्षणाच्या बहु-विद्याशाखिय आणि आंतर विद्याशाखीय स्वरूपाबद्दल सांगितले. ग्रंथपालांनी आगामी काळासाठी डिजिटल स्वरूपामध्ये पुस्तके आणि अभ्यासक्रमाशी संबंधित साहित्य उपलब्ध करण्यावर कार्य करण्याचे आवाहन केले. भारतीय ज्ञान परंपरा अभ्यासक्रमात आणण्यासाठी ग्रंथपाल कसे कार्य करू शकतात यावर भर दिला.

उद्‌घाटनिय कार्यक्रमानंतर उस्मानिया विद्यापीठ हैदराबादचे ग्रंथपाल डॉ. ए. एस. चक्रवर्ती यांनी बीजभाषण करताना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० बाबत माहिती दिली. ग्रंथालयामध्ये उपयोगात येणारे विविध तांत्रिक साधने डिजिटल (एनडीसीएल, ई-रिसोर्स, इनफ्लिबनेट) सेवांची माहिती दिली. तत्पूर्वी उद्‌घाटनिय कार्यक्रमात प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी परिषदेचे उद्‌घाटन करताना भारताला ज्ञानशक्ती बनविण्यासाठी शिक्षक- ग्रंथपालांनी एकत्र येऊन काम करावे, असे आवाहन केले. शिक्षण मंचच्या अध्यक्षा डॉ. कल्पना पांडे यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत माहिती देताना भारतीय ज्ञान परंपरा समजावून सांगितली. डॉ. राजशेखर बालेकर यांनी मनोगत व्यक्त करताना जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केल्याने आयोजकांचे आभार मानले. याच विद्यापीठाचा विद्यार्थी म्हणून हा माझा सर्वात मोठा सन्मान असल्याचे ते म्हणाले. प्रास्ताविक करताना ज्ञान स्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. विजय खंडाळ यांनी विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवाच्या अनुषंगाने तसेच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू होताना त्याला ग्रंथपालांचा हातभार लागावा म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगितले. २५२ प्रतिनिधींनी परिषदेसाठी नोंदणी केली असून ११० संशोधन पत्र प्राप्त झाले होते. त्यातील ९० संशोधन पत्र प्रकाशित केल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. मंजू दुबे यांनी केले तर आभार डॉ. विनय पंडे यांनी मानले.

## जीवन गौरव पुरस्काराने सन्मान

ग्रंथालयाशी संबंधित संपूर्ण आयुष्य देत कार्य करणारे डॉ. दत्तात्रय देशपांडे आणि डॉ. राजशेखर बालेकर यांचा या कार्यक्रमात जीवनगौरव पुरस्कार देत सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये त्यांच्या सन्मानपत्राचे वाचन करण्यात आले. सोबतच राष्ट्रीय परिषदेच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेली स्मरणिका आणि प्राप्त झालेले संशोधन लेखन प्रकाशित करण्यात आले.ग्रंथालय भारती नागपूर महानगरचे अध्यक्ष श्री. प्रशांत तुंगार यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.



## स्वातंत्र्य, समता, बंधुता संविधानाचा गाभा
### -कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचे प्रतिपादन
### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण

स्वातंत्र्य समता आणि बंधुता हे केवळ प्रास्ताविकेतील तीन शब्द नसून संविधानाचा मूळ गाभा असल्याचे प्रतिपादन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात जमनालाल बजाज प्रशासकीय भवन येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त शुक्रवार, दिनांक २६ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. चौधरी मार्गदर्शन करीत होते.

मोठ्या संघर्षातून देशाला मिळालेल्या स्वातंत्र्याची पुढील पिढीला जाणीव व्हावी म्हणून आपण राष्ट्रीय सण साजरा करतो असे कुलगुरू डॉ. चौधरी पुढे बोलताना म्हणाले. तत्पूर्वी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहण कार्यक्रमाला प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल, अधिष्ठाता सर्वश्री डॉ. प्रशांत माहेश्वरी, डॉ. संजय कविश्वर, डॉ. शामराव कोरेटी, डॉ. प्रशांत कडू, आयआयएल संचालक डॉ राजेश सिंह, शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, विद्यार्थी विकास संचालक डॉ. मंगेश पाठक, ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक डॉ. विजय खंडाळ यांच्यासह विविध विभागांचे विभाग प्रमुख, शिक्षक, उपकुलसचिव अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. कार्यक्रमाचे संचालन डॉ. शरद सूर्यवंशी यांनी केले.




## विद्यापीठात प्राचार्यांसाठी 'स्कूल कनेक्ट'
## स्कूल कनेक्ट उपक्रम राबविण्याचे कुलगुरूंचे आवाहन

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० बाबत विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती करण्याच्या अनुषंगाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात प्राचार्यांसाठी 'स्कूल कनेक्ट' कार्यशाळा घेण्यात आली. अंबाझरी मार्ग वरील गुरुनानक भवन येथे बुधवार, १७ जानेवारी २०२४ रोजी झालेल्या कार्यशाळेला ३५०-४०० प्राचार्य, प्रतिनिधींनी उपस्थिती दर्शविली. 'स्कूल कनेक्ट' कार्यक्रमांतर्गत शिक्षकांकरीता आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, मानव्य विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, आंतर विद्याशाखीय विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषण करताना कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी यांनी 'स्कूल कनेक्ट' उपक्रमाची माहिती दिली. या उपक्रमातून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे त्यांनी उपस्थित त्यांना आवाहन केले.

कार्यशाळेत आगामी शैक्षणिक क्षेत्रात महाविद्यालयामध्ये प्रवेश घेणाऱ्या १२ च्या विद्यार्थ्यांमध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत जागृती करण्याबाबत माहिती देण्यात आली. कार्यशाळत अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर यांनी एनईपीमुळे शैक्षणिक आराखड्यामध्ये संरचनात्मक बदल होणार आहेत असे सांगितले. महाविद्यालयामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये या बदलाबाबत माहिती असणे गरजेचे आहे. एनईपीनुसार विद्यार्थ्यांना एक मेजर विषय, मायनर विषय तसेच खुले निवडक (ओपन इलेक्टिव्ह) विषय, कौशल्य, व्यावसायिक कौशल्यवाढ तसेच वर्धन करणाऱ्या अभ्यासक्रम याबाबत माहिती दिली. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार प्रमाणपत्र, पदविका, पदवी आणि त्यानंतर पुढील शिक्षण कसे असेल याबाबत माहिती दिली. सद्यस्थितीत असलेले उच्च शिक्षणामधील विद्यार्थ्यांचे प्रमाण त्याचप्रमाणे २०३५ मध्ये राहणारे प्रमाण, पायाभूत सोयी सुविधा याचा विचार करून नवीन शैक्षणिक धोरण तयार करण्यात आले असल्याचे सांगितले. क्रेडिटवर आधारित अभ्यासक्रम, सीबीसीएस, सीजीपीए, क्रेडिट फ्रेमवर्क स्ट्रक्चर याबाबत त्यांनी माहिती दिली. एनईपीमध्ये विविध कौशल्य आधारित नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. एका विद्याशाखेतील विद्यार्थ्यांना दुसऱ्या विद्याशाखेतील विषय अभ्यासक्रमात घेता येऊ शकतो.' मल्टिपल एन्ट्री मल्टिपल एक्झिट' याबाबत उपस्थित शिक्षकांना माहिती दिली. मानव्य विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी नवीन शैक्षणिक धोरणानुसार मानव्य विज्ञान विद्या शाखा अंतर्गत होणाऱ्या बदलाबाबत यावेळी माहिती दिली. त्याचप्रमाणे आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी आंतर विद्या शाखा अभ्यासक्रमामधील बदलाची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य यांनी केले. कार्यशाळेला चारही जिल्ह्यातील ३५० ते ४०० प्राचार्य, आयक्यूएसी सदस्य व प्राचार्य प्रतिनिधी यांची उपस्थिती होती.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला संघाची घोषणा
### ऑल इंडिया आंतरविद्यापीठ बुद्धिबळ स्पर्धेत होणार सहभागी

मारवाड विद्यापीठ, राजकोट यांच्या यजमानपदाखाली २५ जानेवारी पर्यंत चालणाऱ्या ऑल इंडिया आंतरविद्यापीठ बुद्धिबळ स्पर्धेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला संघाची घोषणा नुकतीच करण्यात आली आहे. महिला संघ स्पर्धा स्थळी दाखल झाल्याची माहिती विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी दिली. नुकत्याच पार पडलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ बुद्धिबळ स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला संघाने दमदार कामगिरी करीत स्पर्धेत अव्वल स्थान पटकाविले होते. याच कामगिरीच्या जोरावर या संघाची निवड ऑल इंडिया आंतरविद्यापीठ बुद्घिबळ स्पर्धेसाठी झाली होती. मंगळवारी झालेल्या उद्घाटनीय कार्यक्रमात विद्यापीठाच्या महिला संघाने हजेरी लावली. स्पर्धेत एकूण १६ संघ सहभागी होणार आहे. विद्यापीठाचा महिला संघ- तान्या पांडे, सीया ठाकरे, मैथीली खुजे- तिन्ही रामदेवबाबा इंजिनिअरिंग कॉलेज, मृदूल डेहनकर- सेंट विंन्सेट पलोटी इंजिनिअरींग कॉलेज, गायत्री पाणबुडे- सिटी प्रिमियर कॉलेज, रिद्धी पालोरकर- हिस्लॉप कॉलेज. प्रशिक्षक- जितेंद्र ठाकरे, व्यवस्थापक - डॉ. प्रतिभा पवार.




## रोहतक विद्यापीठाने जिंकला टी-२० कुलगुरू चषक

# जामिया मिलीया इस्लामिया विद्यापीठाला केले पराभूत

## अखिल भारतीय विद्यापीठ कर्मचारी टी-२० कुलगुरू चषक क्रिकेट स्पर्धा

अखिल भारतीय विद्यापीठ कर्मचारी टी-२० क्रिकेट स्पर्धेचा कुलगुरू चषक महर्षी दयानंद विद्यापीठ रोहतक संघाने जिंकला. एमडीयू रोहतक संघाने अंतिम लढतीत जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ दिल्ली संघाचा ५ विकेटने पराभव केला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षाच्या अनुषंगाने कुलगुरू चषक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. एस.बी. सीटी महाविद्यालय सक्करदरा येथील क्रिकेट मैदानावर अंतिम सामना शनिवार, दिनांक ६ जानेवारी २०२४ रोजी पार पडला. पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुजित मेत्रे अधिसभा सदस्य डॉ. संजय चौधरी यांची उपस्थिती होती.

प्रथम फलंदाजी करीत जामिया मिलिया इस्लामिया संघाने २० षटकात ९ बाद १५१ धावा काढल्या. सलामीवीर मोहम्मद युसुफ यांनी ३२, मोहम्मद आकीब यांनी ३५ धावा काढत संघाला चांगली सुरुवात करून दिली. आदिल यांनी ३७ व वाहिद यांनी १४ धावा काढल्या. रोहतक संघाचे रणबीर राणा यांनी ३ बळी घेतले. नरेंदर शिलक यांनी २ तर दीपक कुमार व पंकज नैन यांनी प्रत्येकी १ बळी टिपला. १५१ धावांचा पाठलाग करताना रोहतक संघाची खराब सुरुवात झाली. सलामी वीर नरेंद्र शिलक शून्यावर बाद झाले. मात्र, विपीन सैनी यांच्या १८, राज कुमार ७४, गौरव धुरेजा यांच्या ३७ व दीपक कुमार यांच्या १४ धावांच्या मदतीने रोहतक संघाने १८.४ षटकात ५ बाद १५५ धावा काढत कुलगुरू चषक जिंकला. जामिया मिली या संघाचे वजाहत यांनी ४ तर वाहिद यांनी १ विकेट घेतली. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले. प्रास्ताविक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी केले. संचालन डॉ. आदित्य सोनी यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले. यावेळी आयोजन समितीचे दिनेश दखणे, दर्पण गजभिये, डॉ. चंद्रमणी सहारे, रितेश पुरकाम, दुर्गेश बैस, नितीन खरबडे, ईश्वर कुंटे, विलास बनसोड, शरद बागडे, कवडू भोयर, विनय पडोळे, नितीन पालकर, विजय इंगळे, निनाद राऊत, रितेश कांबळे यांनी स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

## नरेंदर शिलक चषकवीर

विजेता संघ महर्षी दयानंद विद्यापीठ रोहतक संघाचा कुलगुरू चषक देऊन कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी व अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. द्वितीय स्थान पटकावणारा जामिया मिलिया इस्लामिया संघ त्याचप्रमाणे तिसरे स्थान पटकावणारा लाला लजपत राय पशु चिकित्सा व पशु विज्ञान विद्यापीठ हिसार संघाचा चषक देऊन सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे चषकवीर आणि उत्कृष्ट फलंदाज म्हणून रोहतक संघाचे नरेंदर शिलक, उत्कृष्ट गोलंदाज म्हणून जम्मू विद्यापीठाचे राजकुमार बक्षी यांचा सत्कार करण्यात आला. अंतिम सामन्यातील सामनावीर म्हणून रोहतक संघाचे राज कुमार तर तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या सामन्यातील सामनावीर म्हणून डॉ. गौरव छारया यांचा सत्कार करण्यात आला. तिसऱ्या स्थानासाठी लाला लजपत राय पशु चिकित्सा व पशु विज्ञान विद्यापीठ हिसार आणि जम्मू विद्यापीठ यांच्या दरम्यान शनिवारी सकाळी सामना पार पडला. यामध्ये हिसार संघाने ७ गडी राखत विजय मिळविला.




## फुले दाम्पत्याने महिलांना ज्ञानाच्या परंपरेशी जोडले - डॉ. थोरात

### फुले दाम्पत्य आणि सामाजिक प्रबोधन चळवळ विषयावर परिसंवाद

महात्मा ज्योतिबा फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी १ जानेवारी १८४८ रोजी मुलींसाठी पहिली शाळा सुरू करून महिलांना ज्ञानाच्या परंपरेशी जोडले. तथागत बुद्धांनी सर्वप्रथम महिला भिक्षूंचा समावेश करून संघाची सुरुवात केली. तिथून सुरू झालेली ही परंपरा फुले दाम्पत्याने पुनरुज्जीवित केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढे नेले, असे प्रतिपादन ज्येष्ठ फुले आंबेडकर साहित्यिक विचारवंत प्रा. डॉ. विमल थोरात यांनी व्यक्त केले.

फुले दाम्पत्याने १ जानेवारी १८४८ रोजी पहिली महिला शाळा सुरू केली. त्याला सोमवारी १७५ वर्षे पूर्ण झाली. यानिमित्ताने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास व विचारधारा विभागातर्फे एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. परिसंवादाच्या उद्घाटन सत्रात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. थोरात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू होते. व्यासपीठावर अध्यापन विभाग प्रमुख डॉ. अविनाश फुलझेले उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. प्रशांत कडू यांनी तरुणांचा समावेश झाल्याशिवाय चळवळ पुढे सरकणार नाही. आता नव्या विचारांच्या शाळा सुरू करण्याची गरज व्यक्त केली. प्रास्ताविक डॉ. अविनाश फुलझेले यांनी केले. पहिल्या सत्रात पीडब्ल्यूएस महाविद्यालयातील डॉ. प्रज्ञा बागडे यांनी प्रमुख वक्ते म्हणून फुले दाम्पत्याच्या शैक्षणिक वाटचालीवर विवेचन केले. दुसऱ्या सत्रात यशवंत येथील प्रा. प्रमोद नारायणे, समारोपीय सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ.गौतम कांबळे होते. प्रमुख वक्ते डॉ.रमेश शंभरकर होते.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा फुटबॉल संघ चॅम्पियन

### ऑल इंडिया विद्यापीठ स्पर्धेसाठी ठरला पात्र



मुंबई येथील एचएसएनसी विद्यापीठाच्या यजमान पदाखाली घेण्यात आलेल्या पुरुष गटाच्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संघाने धडाकेबाज कामगिरी करीत पश्चिम विभागीय फुटबॉल स्पर्धेतील चॅम्पियनशिप आपल्या नावे केली आहे. याच कामगिरीच्या जोरावर विद्यापीठाचा फुटबॉल संघ अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी पात्र ठरला असल्याची माहिती विद्यापीठ क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी दिली.

विद्यापीठाचा फुटबॉल संघ पंजाब येथे होणाऱ्या अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. प्रशिक्षक फ्रान्सिस डेव्हिड आणि संघव्यवस्थापक रॉड्रिक्स अँथोनी यांच्या मार्गदर्शनात या संघाने हे यश प्राप्त केले. फुटबॉल संघाच्या कामगिरीबद्दल क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी समाधान व्यक्त केले आहे. तर विद्यापीठ संघाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी अभिनंदन करीत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

विद्यापीठाचा विजयी संघ - मिशकत अहम, निजेल झेव्हियर, प्रीत कनोजिया, मो. अकदास, मो. असद, मो. मोईज अकमल, आयुष केसरी, मो. हंजाला, बादल सोरेन, मो. अशरफ, शुभ्रदीप दास, तेजस चाफले, एच. राजा, गौरव सायरे, अमोल मदनकर, एस. अंसारी, जमीर शेख, रंजोय बानिक, अमन तुटी, मो. नोमन. राखीव खेळाडू- ॲलेक्स टोपो, मो. नासीर, अनुराग चांदे, चेतन राउत, मोइन बेग, प्रियांशी शर्मा, संविधान दहिवले, इमॅनूएल, निखिलेश पेढेकर, तन्मय खांदे, गीत हिरनखेडे, आदित्य नेवारे.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात सावित्रीबाई फुले जयंती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. यावेळी सामान्य प्रशासन विभागातील युडीसी शैलेश राठोड, योगेश केवटे, मनोज मोरे, रुपेश आतराम, नरेंद्र पवार, आसिफ शेख, प्रदीप झोडे, शितल शेटे यांच्यासह अन्य उपस्थित होते.

## नितीन गडकरींनी नव्या वर्षात दिली नवी दिशा – खासदार रामदास तडस

### 'खासदार औद्योगिक महोत्सव – ॲडव्हांटेज विदर्भ' कार्यक्रमस्थळाचे भूमिपूजन






केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून विदर्भातील चांगल्या खेळाडूंनी समोर आणले असून संपूर्ण देशात क्रीडा महोत्सवांचे आयोजन केले जात आहे. आता त्यांनी 'खासदार औद्यागिक महोत्सव-ॲडव्हांटेज विदर्भ'च्या माध्यमातून विदर्भातील उद्योगांना प्रोत्साहित करण्याचे महत्वाचे पाऊल उचलले आहे. नवीन वर्षात त्यांनी उद्योगांना या माध्यमातून नवी दिशा दिली असून त्यामुळे विदर्भात उद्योजक आणि युवकांमध्ये नवी चेतना निर्माण होईल, असा आशावाद वर्धेचे खासदार रामदास तडस यांनी व्यक्त केला.

केंद्रीय मंत्री मा. ना. नितीनजी गडकरी यांच्या संकल्पनेतून आकाराला आलेल्या असोसिएशन फॉर इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट (एड) च्या वतीने येत्या २७ ते २९ जानेवारी २०२४ दरम्यान 'खासदार औद्योगिक महोत्सव – ॲडव्हांटेज विदर्भ' चे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय इमारत परिसरात आयोजन होणार असून या महोत्सवाच्या स्थळाचे भूमिपूजन बुधवार, दिनांक ३ जानेवारी २०२४ रोजी थाटात पार पडले.

याप्रसंगी गडचिरोलीचे खासदार अशोक नेते, रामटेकचे खासदार कृपाल तुमाने, आमदार मोहन मते यांच्यासह वर्ल्ड ट्रेड सेंटरचे अनुप खंडेलवाल, बैद्यनाथचे सुरेश शर्मा, शारदा इस्पात लि. चे नंदकिशोर सारडा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, माजी महापौर कल्पना पांडे, गोविंद देहडकर यांच्यासह औद्योगिक क्षेत्रातील अनेक मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

खासदार अशोक नेते यांनी गडचिरोली जिल्ह्यात नैसर्गिक साधनसंपत्ती मुबलक प्रमाणात असून केवळ पायाभूत सुविधांच्या अभावामुळे येथे उद्योग येऊ शकले नाही, अशी खंत व्यक्त केली. खासदार कृपाल तुमाने यांनी विदर्भात मोठ्या उद्योगांची गुंतवणूक वाढली तर उद्योग वाढतील आणि परिणामस्वरूप बेरोजगार युवकांच्या हाताला काम मिळेल. ॲडव्हांटेज विदर्भमध्ये त्यादृष्टीने प्रयत्न करावे, असा सल्ला दिला. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी अध्यक्षीय भाषणातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे कौशल्य विकासासाठी राबविण्यात येणा-या विविध प्रशिक्षणांची माहिती दिली. एडचे अध्यक्ष आशीष काळे यांनी प्रास्ताविकातून विदर्भातील सर्वात मोठ्या ॲडव्हांटेज विदर्भ मध्ये आयोजित करण्यात येणा-या इंडस्ट्रियल एक्स्पो, बिझनेस आणि इन्व्हेस्टमेंट कॉन्क्लेव्हची माहिती दिली. संचालन सचिव डॉ. विजय शर्मा यांनी केले. राजेश बागडी यांनी आभार मानले. ॲडव्हांटेज विदर्भच्या सफलतेसाठी एडचे उपाध्यक्ष प्रणव शर्मा व गिरधारी मंत्री, सदस्य राजेश रोकडे, निखिल गडकरी, डॉ. महेंद्र क्षिरसागर, प्रदीप माहेश्वरी, प्रशांत उगेमुगे व रवींद्र बोरटकर यांचे सहकार्य लाभत आहे.





## विद्यापीठ विधी महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात '२२ वर्ष सोबतीचे' असा माजी विद्यार्थी मेळावा पार पडला. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष डॉ. रविशंकर मोर यांचा सत्कार करण्यात आला.

या एकत्रीकरण कार्यक्रमात २००१ ते २००६ बीए एलएलबी ५ वर्षीय अभ्यासक्रमाच्या बॅचचे ७५ विद्यार्थी उपस्थित होते. या पैकी अनेक विद्यार्थी न्यायाधिश, वकिल, काही सामाजिक कार्यकर्ते तर अनेक विद्यार्थी वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत आहे. काही विशेष उपस्थितांमधे न्यायाधिश आनंद बोरकर, न्यायाधिश स्वाती उपाध्ये, सामाजिक कार्यकर्ता कीर्ती सावले, प्रा. जय भोंगाडे, स्पेशल पब्लीक प्रासीक्यूटर श्री. आकाश मुन, ॲड. अशफाफ शेख, ॲड. सिंग इत्यादी उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना प्रा. डॉ. रविशंकर मोर म्हणाले प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात आपल्या आई- वडीलांइतकाच महत्वाचा वाटा त्यांनी शिक्षण घेतलेल्या महाविद्यालयाचा असतो म्हणून आपण आपल्या महाविद्यालयासाठी जे काही शक्य आहे ते नक्की केले पाहिजे. येत्या वर्षात म्हणजे २०२५ मध्ये महाविद्यालयाला १०० वर्ष पूर्ण होत आहे, हे वर्ष साजरे करण्यासाठी सर्वांनी आपले मत व कल्पना सुचवाव्या जेणे करून, १०० वे वर्ष एक अविस्मरणीय ठरेल असे मत व्यक्त केले. सर्वच विद्यार्थी महाविद्यालयाला भेट देऊन आनंदी दिसत होते तर काही भावुक सुध्दा झाले होते.

## अभिषेक जांगीड, युवराज शेओराम खेलो इंडिया स्पर्धेसाठी पात्र

### अ. भा. आंतरविद्यापीठ बॉक्सिंग स्पर्धा

चंदीगढ विद्यापीठ, मोहलीच्या अधिपत्याखाली घेण्यात आलेल्या पुरुषांच्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत दमदार कामगिरी करणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे बॉक्सर अभिषेक जांगीड, युवराज शेओराम यांनी खेलो इंडिया विद्यापीठ गेम्स स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले आहे. स्पर्धेत ५४-५७ किलो वजनगटात पहिल्या फेरीत युवराज शेओराम याने एमकेयूएमटीच्या कवियन टी. नमवित दुसरी फेरी गाठली. दुसऱ्या फेरीत युवराजने एमएनयूच्या एनजी. ज्युपिटर सिंगला नमवित तिसरी फेरी म्हणजेच उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. दरम्यान युवराजला उपांत्यपूर्व फेरीत सीयूएमच्या दीपककडून पराभव स्वीकारावा लागला. परिणामी युवराजचे या स्पर्धेत पदक मिळविण्याचे प्रयत्न अयशस्वी ठरले.

स्पर्धेत तीन पैकी दोन फेऱ्यांमध्ये विजय नोंदविणारे विद्यापीठाचे अभिषेक जांगीड व युवराज शेओराम हे दोन्ही खेळाडू खेलो इंडिया विद्यापीठ गेम्ससाठी पात्र ठरले आहे. प्रशिक्षक दिनेश राऊत व व्यवस्थापक शैलेश रामटेके यांच्या मार्गदर्शनाखाली या दोन्ही खेळाडूंनी हे यश प्राप्त केले. खेळाडूंनी केलेल्या या कामगिरीबद्दल नागपूर विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी समाधान व्यक्त केले असून कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी या दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन करीत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.









# विद्यापीठातील 2 शिक्षकांना महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सेसचे फेलो म्हणून मान्यता डॉ. दादासाहेब कोकरे व डॉ. प्रशांत गाडे यांचा समावेश

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील २ शिक्षकांना महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सेसचे फेलो म्हणून मान्यता प्रदान केली आहे. औषधी निर्माण शास्त्र विभागातील डॉ. दादासाहेब कोकरे आणि भौतिकशास्त्र विभागातील डॉ. प्रशांत गाडे यांचा यात समावेश आहे. एमआयटी पीस विद्यापीठ पुणे येथे झालेल्या कार्यक्रमात फेलो पुरस्कार प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र अकादमी ऑफ सायन्सेस ही महाराष्ट्र राज्याची प्रमुख वैज्ञानिक संस्था आहे. १९७६ मध्ये राज्याला भेडसावणार्या वैज्ञानिक आणि तांत्रिक समस्यांवर प्रकाश टाकणे आणि आवश्यक ती पावले उचलण्याची शिफारस करणे या विशिष्ट उद्देशाने या संस्थेची स्थापना करण्यात आली. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रचारासाठी संबंधित अधिकाऱ्यांकडून अकॅडमी मध्ये याबाबत विस्तृत चर्चा केली जाते. प्रतिष्ठित शास्त्रज्ञांना या संस्थेकडून फेलो म्हणून मान्यता प्रदान केली जाते. औषधीनिर्माणशास्त्र विभागातील डॉ. दादासाहेब कोकरे यांचे औषधांचा प्राण्यांच्या मेंदूवर होणारा परिणाम या विषयावर संशोधनात मोठे योगदान आहे. प्राण्यांच्या मेंदूवर औषधांचा होणारा परिणाम याचा अभ्यास करीत मानवी मेंदूच्या आजारावरील औषधी निर्माण क्षेत्रात डॉ. कोकरे यांच्याकडून संशोधन केले जात आहे. त्याचप्रमाणे भौतिकशास्त्र विभागातील डॉ. प्रशांत गाडे यांचे सैद्धांतिक आणि संगणकीय भौतिकशास्त्र क्षेत्रात महत्त्वपूर्ण संशोधन कार्य आहे. या विषयातील संशोधन कार्यात दिलेल्या योगदानाबाबत डॉ. कोकरे व डॉ. गाडे यांचा फेलो म्हणून पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला आहे. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, औषधी निर्माण शास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रमोद खेडेकर व भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमणकर यांनी दोन्ही शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.





# विद्यार्थ्यांनी अनुभवला मानव उत्क्रांतीचा इतिहास भारतीय प्रागैतिहासिक वैभवावर विद्यापीठात प्रदर्शनी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात भारतीय प्रागैतिहासिक वैभवावर दोन दिवसीय प्रदर्शनीचे आयोजन मंगळवार, दिनांक २ व बुधवार ३ जानेवारी २०२४ रोजी करण्यात आले. मानव उत्क्रांतीचा इतिहास या प्रदर्शनीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी अनुभवला. विद्यापीठाचा प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्त्व विभाग आणि भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग नागपूर मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते.

विभागात आयोजित प्रदर्शनीचे उद्घाटन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी पेंच वन्यजीव विभागाचे क्षेत्र संचालक डॉ. प्रभुनाथ शुक्ला, प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्त्व विभाग डॉ. प्रबास साहू, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग नागपूरचे अधिक्षण पुरातत्त्वविद अरुण मलिक, सहाय्यक पुरातत्त्वविद शरद गोस्वामी, भारतीय मानव विज्ञान सर्वेक्षण विभागाचे संचालक निलांजन खटुआ, सहसंचालक राजकिशोर मोहतो यांची

प्रामुख्याने उपस्थिती होती. मानवाच्या निर्मिती ते उत्क्रांती विकास प्रक्रियेतील चार्ट या ठिकाणी प्रदर्शित करण्यात आला होता. मानवाने उत्क्रांती दरम्यान उपयोग केलेले विविध उपकरण चार्टच्या माध्यमातून दाखविण्यात आले.

पाषाणकालीन, मध्य पाषाण, नव पाषाण या तीनही युगातील विविध वस्तू प्रदर्शनीत ठेवण्यात आल्या होत्या. या प्रदर्शनीमध्ये संपूर्ण भारतातील शिल्प चित्रकला प्रदर्शित करण्यात आली. पाषाणकाला नंतरची शैल चित्रकला विद्यार्थ्यांना आकर्षित करीत होती. सोबतच भंडारा जिल्ह्यातील बावनथडी, चंद्रपूर जिल्ह्यातील नगर गोटा, अमरावती जिल्ह्यातील गाविलगड इत्यादी विविध ठिकाणातील शैल चित्रकला या प्रदर्शनीचे आकर्षण ठरले होते. प्रदर्शनीच्या निमित्ताने विभागातील विद्यार्थ्यांनी स्वतःहून पाषाणकालीन झोपडीचे निर्माण केले होते. ही झोपडी येणाऱ्या सर्वांचे लक्ष आकर्षित करीत होती. सोबतच या निमित्ताने विभागातील पुरातत्व अवषेशाचे प्रदर्शन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभागातील शिक्षक डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे, डॉ. अमरदीप बारसाकळे, डॉ. मोहन पारधी, के. एस. चंद्रा, डॉ. एकता धारकर, शैला







## परसाई हिंदी उपहासात्मक लेखनाचे शिरोमणी- वरिष्ठ साहित्यिक डॉ. बुद्धिनाथ मिश्र यांचे प्रतिपादन

### विद्यापीठ हिंदी विभागात हरिशंकर परसाई जन्मशताब्दी निमित्त राष्ट्रीय चर्चासत्र

हरिशंकर परसाई हे उपहासात्मक हिंदी साहित्य लेखनातील शिरोमणी असल्याचे प्रतिपादन वरिष्ठ साहित्यिक डॉ. बुद्धिनाथ मिश्र यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हिंदी विभागात हरिशंकर परसाई जन्मशताब्दी निमित्त 'हिंदी व्यंग आणि परसाई' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्राचे उद्घाटन करताना डॉ. मिश्र हे सोमवार, दिनांक ८ जानेवारी २०२४ रोजी बोलत होते.

कार्यक्रमाची अध्यक्षता करताना प्र-कलगुरु डॉ. संजय दुधे यांनी उपहासात्मक लेखन हे लोकजीवनाची अभिव्यक्ती असल्याचे सांगितले. रायपूर येथील वरिष्ठ व्यंगकार श्री गिरीश पंकज यांनी उपहासात्मक लेखनाचे आदी प्रणेता संत कबीर असल्याचे सांगितले. डॉ. सिद्धार्थ कुमार श्रीवास्तव यांनी परसाई यांच्याशी संबंधित रोचक प्रसंग यावेळी सांगितले. हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे यांनी प्रास्ताविक करताना परसाई उपहासात्मक लेखनाला एक असे माध्यम मानत होते की त्यामुळे कटू वाक्य देखील सहज रूपाने अभिव्यक्त होत होते. संचालन डॉ. संतोष गिरहे यांनी केले तर आभार डॉ. लखेश्वर चंद्रवंशी यांनी मानले. यावेळी डॉ. गोविंद प्रसाद उपाध्याय, डॉ. निरज व्यास, डॉ आभा सिंह, डॉ. बुद्धिनाथ मिश्र, गिरीश पंकज, टीकाराम साहू, अनिल मालोकार यांनी त्यांच्या उपहासात्मक रचनेतून परसाई यांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी शहरातील साहित्यिक संतोष पांडे (बादल), डॉ. मिथिलेश अवस्थी, नरेंद्र परिहार, डॉ. अविनाश बडगे, अनिल त्रिपाठी, डॉ. सुषमा नरआंजए, डॉ. एकादशी जैतवार, डॉ. सुमित सिंह, डॉ. कुंजनलाल लिल्हारे, प्रा. जागृती सिंह, डॉ. गिरीजा शंकर गौतम, अजय पांडे, कृष्ण नागपाल, मधुलता व्यास यांच्यासह मोठ्या संख्येने संशोधक, विद्यार्थी तथा नागरिक उपस्थित होते.



## नायलॉन मांजा विरोधी सामाजिक जाणीव निर्माण करा

### प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

### भौतिकशास्त्र विभागात एनएसएसतर्फे जनजागृती



संक्रांतीच्या पर्वावर मोठ्या प्रमाणात पतंग उडविले जातात. यात नायलॉन मांजाचा वापर होत असल्याने विविध घटना घडत आहेत. त्यामुळे नायलॉन मांजा विरोधी सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे आवाहन माननीय प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी केले. भौतिकशास्त्र विभागात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने नायलॉन मांजा विरोधी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन मंगळवार, दिनांक ९ जानेवारी २०२४ रोजी करण्यात आले. यावेळी अध्यक्ष स्थानावरून डॉ. दुधे बोलत होते.

भौतिकशास्त्र विभागातील सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, प्रमुख अतिथी म्हणून जीएमसी नागपूरचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अविनाश गावंडे, 'गाठ' लघुपटाचे नायक मुकुंद वसुले, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमणकर, एनएसएस समन्वयक डॉ. संजय ढोबळे, दिग्दर्शक सुबोध आनंद, अभिनेता सचिन गिरी, बालकलाकार गौरांश गोहणे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी नायलॉन मांजामुळे होत असलेल्या घटनांबाबत चिंता व्यक्त केली.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अविनाश गावंडे यांनी कोरोना संकट काळातील लॉकडाऊनमध्ये आलेले विविध अनुभव विशद केले. नायलॉन मांजामुळे अनेक घटना घडत असल्याचे सांगितले. यासाठी आपत्ती व्यवस्थापन पथक तयार केले. याबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली. अभिनेता मुकुंद वसुले यांनी लघुपटाच्या माध्यमातून मांजा वापरण्याचे दुष्परिणाम सांगण्याचा प्रयत्न केला आहे. भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमणकर यांनी नायलॉन मांजाने पतंग उडविण्याचे विविध दुष्परिणाम असल्याचे सांगत बंदी असताना नायलॉन मांजा येतो तरी कुठून असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. प्रास्ताविक करताना डॉ. संजय ढोबळे यांनी कार्यक्रमाच्या आयोजना मागील भूमिका सांगितली. अभिनेता सचिन गिरी यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचलन वेंकटेश तिवारी यांनी केले तर आभार प्रियंका चरडे यांनी मानले.

### गाठ लघुपटाचे सादरीकरण

नायलॉन मांजाचे दुष्परिणाम दर्शविणारा 'गाठ' लघुपट यावेळी दाखविण्यात आला. या कार्यक्रमाला लघुपटाचे निर्माते डॉ. महेंद्र गोहणे, दिग्दर्शक सुबोध आनंद, नायक मुकुंद वसुले, सचिन गिरी, गौरांश गोहने, प्रकाश देवा, श्रीदेवी देवा, संग्रामसिंह ठाकुर, विनय वासनिक, कांचन गोहणे, मेकअप मॅन रमेश वाटकर यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात प्र-कुलगुरूंच्या हस्ते लघुपटातील कलाकारांचे स्वागत करण्यात आले.






## ग्रंथालयांनी सर्वोत्कृष्ट कार्यातून वाढवाव्या ज्ञानाच्या कक्षा - कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचे प्रतिपादन
## विद्यापीठात ग्रंथालय क्षमता निर्माण कार्यक्रम

ज्ञानाच्या कक्षा वाढविण्यासाठी ग्रंथालयांनी सर्वोत्कृष्ट कार्य करावे, असे प्रतिपादन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा ग्रंथालय आणि माहिती विज्ञान विभाग, भारत व सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालय अंतर्गत राजा राममोहन राय लायब्ररी फाउंडेशन कोलकत्ता आणि सारस्वत सभा लायब्ररी नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथालयाचा सार्वजनिक वाचनालय राष्ट्रीय मिशन क्षमता निर्माण कार्यक्रमाचे सोमवार, दिनांक ८ जानेवारी ते १२ जानेवारी २०२४ दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. मिशनचा उद्‌घाटनिय कार्यक्रम सोमवार, दिनांक ८ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता औषधी निर्माण शास्त्र विभागातील डॉ. ए.के. डोरले सभागृहात पार पडला यावेळी कुलगुरू डॉ. चौधरी मार्गदर्शन करीत होते.

उद्‌घाटनिय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय मानव विज्ञान

सर्वेक्षण विभागाचे संचालक डॉ. बी. व्ही. शर्मा, आयएलए नवी दिल्लीचे अध्यक्ष डॉ. मोहन खेरडे, आंतर विद्यासाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, पब्लिक लायब्ररी ऑफ महाराष्ट्र संचालक डॉ. अशोक गाडेकर, समन्वयक डॉ. शालिनी लिहितकर, डॉ. एस. एम. निकोसे, प्रोजेक्ट ऑफिसर श्री दीपांजन चॅटर्जी, सारस्वत सभा लायब्ररीचे सचिव श्री प्रदीप गांगुली यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. माननीय कुलगुरू डॉ. चौधरी यांनी राष्ट्रसंतांच्या कार्यावर आणि साहित्यावर प्रकाश टाकून सर्वांनी जनहितासाठी कार्य करण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक करताना समन्वयक डॉ. शालिनी लिहितकर यांनी सर्व अतिथी आणि प्रतिनिधींचे स्वागत केले. डॉ. बी. व्ही. शर्मा यांनी त्यांच्या प्रमुख पाहुण्यांच्या भाषणात एनएमएलच्या त्यांच्या ४ घटकांबद्दल सांगितले.

डॉ.मोहन खेरडे यांनी आपल्या भाषणात सार्वजनिक वाचनालय, कायदे याबाबत माहिती दिली. अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी 'रिचिंग टू अनरीच' हा उपक्रम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा शताब्दी वर्षातील मुख्य उद्दिष्ट असल्याचे सांगितले.







# व्यंग सामाजिक परिवर्तनास जमीन तयार करतो

## साहित्यिक गिरीश पंकज यांचे प्रतिपादन

व्यंग सामाजिक परिवर्तनास जमीन तयार करतो असे प्रतिपादन साहित्यिक गिरीश पंकज यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हिंदी विभागाच्या वतीने हरिशंकर परसाई यांच्या जन्मशताब्दी निमित्त राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात मंगळवार, दिनांक ९ जानेवारी २०२४ रोजी श्री. पंकज मार्गदर्शन करीत होते.

सामाजिक असमानतेवर प्रहार करीत समाजाला पोकळ करणारी विद्रुपता आणि त्यांच्या कारणांना उजेडात आणण्याचे काम उपहासात्मक लेखन करते असे पुढे बोलताना पंकज म्हणाले. प्रमुख अतिथी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे हिंदी विभाग प्रमुख डॉ. विजयकुमार रोडे यांनी मार्गदर्शन करताना आधुनिक युगामध्ये समाजात विसंगती वाढली असल्याचे सांगितले. महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय विद्यापीठ वर्धा येथील दुरस्थ शिक्षण केंद्राचे सहाय्यक निदेशक डॉ. प्रकाशनारायण त्रिपाठी यांनी मार्गदर्शन करताना हरिशंकर परसाई हे मानवीय मूल्यांचे अन्वेषक होते, असे सांगितले. सिंधू महाविद्यालयातील हिंदी प्राध्यापिका डॉ. सपना तिवारी यांनी परसाई यांनी हिंदी रचनात्मकतेला एक नवीन आयाम दिला आणि लेखकीय नैराश्य दूर केल्याचे सांगितले. नागपूर येथील प्रसिद्ध व्यंगकार तथा कवी श्री निरज व्यास यांनी आपल्या कवितांच्या माध्यमातून व्यंग रचनेतील सुक्ष्म अंतर समजावून सांगितले. आयुर्वेदाचार्य डॉ. गोविंद प्रसाद उपाध्याय यांनी हरिशंकर परसाई हे समाजातील सजग प्रहरी असल्याचे सांगितले. प्रमुख अतिथी वरिष्ठ गीतकार डॉ. बुद्धिनाथ मिश्र यांनी त्यांच्या उपहासात्मक कविता एकवीत श्रोतांना मंत्रमुक्त केले. समारोपिय कार्यक्रमाची अध्यक्षता करताना मानव्य विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी हरिशंकर परसाई यांचे लेखन कार्य हेच त्यांची ओळख असल्याचे सांगितले. हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे यांनी आभार व्यक्त करताना उपहासाची पूर्णता याचे प्रतीक हरिशंकर परसाई असल्याचे सांगितले. या कार्यक्रमात संशोधक विद्यार्थ्यांकडून आलेल्या शोध पत्रांचे वाचन करण्यात आले. विविध सत्रांचे संचलन डॉ. लखेश्वर चंद्रवंशी, डॉ. नेहा कल्याणी व टीकाराम साहू यांनी केले. चर्चासत्रात डॉ. सिद्धार्थ कुमार श्रीवास्तव, डॉ. संतोष गिन्हे, डॉ. आभा सिंह, नरेंद्र परिहार, अविनाश बडगे, डॉ. सुषमा नरांजे, डॉ. एकादशी जैतवार, डॉ. सुमित सिंह, डॉ. गुंजनलाल लिल्हारे, प्रा. जागृती सिंह, डॉ. गिरीजाशंकर गौतम, डॉ. नेहा कल्याणी, डॉ. नीलम विराणी, अजय पांडे, डॉ. मनोज कुमार, डॉ. मधुलता व्यास यांच्यासह संशोधक, विद्यार्थी त्याचप्रमाणे शहरातील नागरिकांची उपस्थिती होती.

# गणिताशिवाय जीवन अपूर्ण - कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी
## विद्यापीठात गणित दिवसाच्या निमित्ताने कार्यक्रम







आयुष्यामध्ये प्रत्येक ठिकाणी गणिताची आवश्यकता आहे. गणिताशिवाय जीवन अपूर्ण असल्याचे प्रतिपादन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी केले. गणित दिवसानिमित्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक गणित विभागाच्या वतीने मंगळवार, दिनांक ९ जानेवारी २०२४ रोजी श्रीनिवास रामानुजन सभागृहात आयोजित विविध कार्यक्रमांचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. चौधरी मार्गदर्शन करीत होते.

उद्घाटनीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी तर प्रमुख अतिथी म्हणून नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ संचालक डॉ. राजेश सिंह, डॉ. दिवाकर शुक्ला, समन्वयक डॉ. गणेश केदार यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक करताना विभाग प्रमुख डॉ. गणेश केदार यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील माहिती दिली. नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ संचालक डॉ. राजेश सिंह यांनी मार्गदर्शन करताना गणित मॉडेलिंग एक प्रकारचे कौशल्य असल्याचे सांगितले. डॉ. दिवाकर शुक्ला यांनी सांख्यिकी तसेच गणितामधील मॉडेलिंग डाटा अनॅलिसिस व डाटा सायन्स संशोधक विद्यार्थ्यांना अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन श्रुती उगेमुगे हिने केले तर आभार दिया तुरकर या विद्यार्थिनींनी मानले.








## संशोधन, स्पर्धा परीक्षेसाठी मदत करणार ई-रिसोर्स - पदव्युत्तर विधी विभागात संगणक प्रयोगशाळा उद्घाटित
### संगणक लॅब प्रत्येक विभागाची गरज – कुलगुरू

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर विधी विभागात सुसज्ज अशा संगणक प्रयोगशाळेचे उद्घाटन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या हस्ते शुक्रवार, दिनांक ५ जानेवारी २०२४ रोजी करण्यात आले. संशोधन, स्पर्धा परीक्षा तयारी त्याचप्रमाणे न्यायालयीन कामकाज घडामोडीची माहिती मिळविण्यासाठी ई-रिसोर्स मदत करणार आहे. अशी संगणक लॅब प्रत्येक विभागाची गरज असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी उद्घाटन करताना केले.

पदव्युत्तर विधी विभागात पार पडलेल्या कार्यक्रमाला आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. संजय कविश्वर, वित्त व लेखा अधिकारी श्री हरीश पालीवाल, विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. संगणक लॅबचे उद्घाटन केल्यानंतर कुलगुरू डॉ. चौधरी यांनी विद्यार्थ्यांशी संवादला. प्रास्ताविक करताना विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे यांनी सुसज्ज अशी डिजिटल संगणक लॅब सुरू होत असल्याने आनंद व्यक्त केला. संचालन शिखा गुप्ता यांनी केले तर आभार डॉ. विजयता उईके यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता पद्मा घटामे, दिपाली मानकर, आबिद खान, शिवानी खंडाते, रिचा कोचर, सचिन रामटेके, माधुरी ग्लॉलबंश यांनी सहकार्य केले.

# भारतीय ज्ञान तंत्रातच 'ग्लोबल वार्मिंग'चे समाधान

## जलपुरुष डॉ. राजेंद्र सिंह यांचे प्रतिपादन

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात 'चला जाणूया नदीला' कार्यक्रम






पंचमहाभूतालाच पूर्वी भारतीय हे देव मानत असल्याने निसर्ग सुरक्षित होता. त्यामुळे भारतीय ज्ञान तंत्रातच 'ग्लोबल वार्मिंग' चे समाधान असल्याचे प्रतिपादन जलपुरुष डॉ. राजेंद्र सिंह यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग व जलबिरादरी नागपूर जिल्हा नदी समन्वयक आणि विद्यापीठ शताब्दी महोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने 'चला जाणूया नदीला' कार्यक्रम गुरुवार, दिनांक ११ जानेवारी २०२४ जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात पार पडला. यावेळी मुख्य मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाला मुख्य मार्गदर्शक म्हणून जलपुरुष डॉ. राजेंद्रसिंह, अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, विशेष उपस्थिती म्हणून कुलसचिव डॉ. राजू हिवसे, जलबिरादरी महाराष्ट्र राज्य अध्यक्ष श्री नरेंद्र चूग, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांची उपस्थिती होती. पाण्याचे महत्व विशद करताना डॉ. राजेंद्र सिंह यांनी त्यांना पाणी वाचवण्याची प्रेरणा कशी मिळाली याबाबत माहिती दिली. आयुर्वेदाचे शिक्षण घेतल्यानंतर गावातीलच त्यांच्या जलचळवळीचे गुरु असलेल्या एका व्यक्तीने त्यांना प्रेरित केले. गावातील विहिरींमध्ये १५० फुट पेक्षा खोलीवर देखील पाण्याचा थेंब नाही. गावातील नागरिकांना १५ कि.मी. दूरून पाणी आणावे लागत होते. त्यामुळे पाण्यासाठी कार्य करून गावातील या नागरिकांची समस्या सोडविण्याची प्रेरणा जलपुरुष बनवून गेली असे डॉ. राजेंद्रसिंह म्हणाले. अध्यक्षीय भाषण करताना माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी नदीचे महत्व पटवून दिले. प्रास्ताविक करताना महाराष्ट्र राज्य जलबिरादरीचे अध्यक्ष श्री नरेंद्र चूग यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील माहिती दिली. संचालन डॉ. अमृता इंदुरकर यांनी केले तर आभार रासेयो संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांनी मानले





# विद्यापीठ विधी महाविद्यालय व सेवा सदन यूपीएससी अॅकडमी दरम्यान सामंजस्य करार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय व सेवासदन यूपीएससी अॅकडमी यांच्या दरम्यान केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेबाबत सामंजस्य करार करण्यात आला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना यूपीएससी परीक्षेची तयारी करताना आता नवीन पर्याय उपलब्ध होणार आहे. समंजस्य करार करताना विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजू हिवसे, सेवासदन संस्थेचे संचालक अॅड. अंधारे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविशंकर मोर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. रविशंकर मोर आणि यूपीएससी अॅकडमीच्या वतिने डॉ. कविता जाधव यांनी करारावर स्वाक्षरी केली. या करारानुसार दोन्ही संस्थांना त्यांच्या कडे उपलब्ध अनुभवी प्राध्यापकांचा उपयोग होईल असे मत प्राचार्य डॉ. रविशंकर मोर यांनी व्यक्त केले. या करारानुसार विद्यार्थ्यांना यूपीएससीची तयारी करताना अॅकडमीची मदत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नक्कीच होईल असेही ते म्हणाले.







## नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवा

### 'स्कूल कनेक्ट' कार्यशाळेत डॉ. संजय दुधे यांचे आवाहन - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आयोजन

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवा, असे आवाहन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी केले. विद्यापीठाच्या महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील गणित विभागाच्या श्रीनिवास रामानुजन सभागृहात सोमवार, दिनांक १५ जानेवारी २०२४ रोजी पार पडलेल्या 'स्कूल कनेक्ट' कार्यक्रमांतर्गत शिक्षकांकरीता आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात प्र-कुलगुरु डॉ दुधे शिक्षकांना मार्गदर्शन करीत होते. सदर कार्यक्रमात प्रशिक्षित शिक्षक १७-३० जानेवारी दरम्यान विविध कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन १२व्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० बाबत माहिती देवून त्यांची जाणीवजागृती करणार आहेत.

कार्यशाळेला प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांच्यासह विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, मानव्य विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, आंतर विद्याशाखीय विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषण करताना प्र-कुलगुरु डॉ दुधे यांनी आगामी शैक्षणिक क्षेत्रात महाविद्यालयामध्ये प्रवेश घेणाऱ्या १२ च्या विद्यार्थ्यांमध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत जागृती करण्याचे आवाहन केले. कार्यशाळेची सुरुवात करताना अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर यांनी एनईपीमुळे शैक्षणिक आराखड्यामध्ये संरचनात्मक बदल होणार आहेत असे सांगितले. महाविद्यालयामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये या बदलाबाबत माहिती असणे गरजेचे आहे. एनईपीनुसार विद्यार्थ्यांना एक मेजर विषय, मायनर विषय तसेच खुले निवडक (ओपन इलेक्टिव्ह) विषय, कौशल्य, व्यावसायिक कौशल्यवाढ तसेच वर्धन करणाऱ्या अभ्यासक्रम याबाबत माहिती दिली. एनईपीमुळे काय बदल झाला आणि या बदलाने विद्यार्थ्यांना कोणते फायदे होणार आहे, याची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहनही त्यांनी केले. विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार प्रमाणपत्र, पदविका, पदवी आणि त्यानंतर पुढील शिक्षण कसे असेल याबाबत माहिती दिली. सद्यस्थितीत असलेले उच्च शिक्षणामधील विद्यार्थ्यांचे प्रमाण त्याचप्रमाणे २०३५ मध्ये राहणारे प्रमाण, पायाभूत सोयी सुविधा याचा विचार करून नवीन शैक्षणिक धोरण तयार करण्यात आले असल्याचे सांगितले. क्रेडिटवर आधारित अभ्यासक्रम, सीबीसीएस, सीजीपीए, क्रेडिट फ्रेमवर्क स्ट्रक्चर याबाबत त्यांनी माहिती दिली. एनईपीमध्ये विविध कौशल्य आधारित नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. एका विद्याशाखेतील विद्यार्थ्यांना दुसऱ्या विद्याशाखेतील विषय अभ्यासक्रमात घेता येऊ शकतो.' मल्टिपल एन्ट्री मल्टिपल एक्झिट' याबाबत उपस्थित शिक्षकांना माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन करताना अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी प्रवेश घेण्यापूर्वीच विद्यार्थ्यांपर्यंत नवीन बदलाची माहिती पोहोचावी अशी अपेक्षा व्यक्त केली. आभार व्यक्त करताना अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी आंतर विद्याशाखा या मधील बदलाबाबत माहिती दिली. कार्यशाळेला ६० ते ७० शिक्षकांची उपस्थिती होती.

---

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिन उत्साहात




राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात स्वामी विवेकानंद यांची जयंती राष्ट्रीय युवा दिन म्हणून शुक्रवार, दिनांक १२ जानेवारी २०२४ रोजी साजरी करण्यात आली. 'स्वामी विवेकानंद यांच्या विचारांची प्रासंगिकता' या विषयावर मार्गदर्शन करताना विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समय बनसोड यांनी कोटी -कोटी युवकांना प्रेरित केल्याचे सांगितले.




डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमाला राज्यपाल नामित विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. समय बनसोड, सिनेट सदस्य श्री विष्णू चांगदे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. मंगेश पाठक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवीशंकर मोर उपस्थित होते. स्वामी विवेकानंद यांनी आपल्या ३९ वर्षच्या छोट्याश्या आयुष्यात केलेले कार्य अनेक पिढ्यानंतर आजही किती प्रासंगिक असल्याचे डॉ. बनसोड पुढे बोलताना म्हणाले.

विद्यापीठ अधिसभा सदस्य श्री विष्णु चांगदे यांनी विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी सुरू असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. विद्यापीठाच्या जवळपास ४० विद्यार्थी कल्याण योजना सुरु आहे. त्यासाठी १० कोटी रूपयाची वार्षिक तरतुद केली आहे. व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समय बनसोड यांनी हाती घेतले असल्याचे ते म्हणाले.

विद्यापिठात शिक्षण होणाऱ्या सर्वच विद्यार्थिनीला मोफत बस पासची योजना आहे. विद्यार्थी विमा योजना, विद्यार्थी किंवा त्यांच्या वडिलांचा किंवा पालकाचा मृत्यू झाल्यास शिक्षणासाठी ३ लाख रु. ची तरतुद आहे. १०० खेळाडूंसाठी ५ हजार रूपयें प्रती माह पोषण खर्च देण्याची योजना आहे. अशा सर्व योजना गरुडझेप' या पुस्तकरूपाने संकलीत करून संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे.

विद्यापिठाचे विद्यापीठ विकास विभागाचे संचालक डॉ. मंगेश पाठक यांनी विद्यार्थी कल्याण योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. प्राचार्य डॉ. रविशंकर मोर यांनी मनोगतात स्वामी विवेकानंद यांचे विचार नेहमीच युवकांना प्रेरित करतील, असे सांगितले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. राहूल ढोबळे यांनी आभार मानले.



## प्रजासत्ताक दिन मुंबईतील परेडसाठी चेचेनाथची निवड डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयातील विद्यार्थी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाचा विद्यार्थी चेचेनाध भोपी पवार याची प्रजासत्ताक दिनानिमित्त मुंबई येथील राज्यस्तरीय पथ संचलनासाठी निवड झाली आहे. राष्ट्रीय सेवा योजनाच्या वतीने पथसंचलनाचे आयोजन केले जाते.

मुंबई येथील प्रजासत्ताक दिनाच्या पथसंचलनासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने विद्यापीठ स्तरावर निवड स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून आठ विद्यार्थ्यांची सोलापूर येथे आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. सोलापूर येथे संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यापिठातून स्पर्धेसाठी विद्यार्थी आले होते. सोलापूर येथील राज्यस्तरीय चाचणीतून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाचा विद्यार्थी चेचेनाथ गोपी पवार याची मुंबई येथील पथसंचलनासाठी निवड झाली आहे. या खडतर आणि कठीण स्पर्धेमध्ये चेचेनाथ पवार यांनी उल्लेखनीय यश मिळविले. त्यांच्या या कामगिरीमुळे विद्यापिठाचे व विधी महाविद्यालयाचे नाव गौरान्वित झाले. त्यांच्या या यशासाठी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवीशंकर मोर, डॉ. प्रवीणा खोब्रागडे, राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. अधरा देशपांडे यांनी अभिनंदन केले.




## मेट्रो रेल्वे जलद शहरी वाहतुकीचे साधन विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात जागृती कार्यक्रम

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मानव्य विज्ञान विद्याशाखा आणि महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने "मेट्रो रेल्वे जलद शहरी वाहतुकी चे साधन" आणि "रोजगारक्षमता वर्धित कौशल्य" या विषयावर जनजागृती कार्यक्रम राज्यशास्त्र विभागाच्या सभागृहात पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मानव्य विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या वतीने मल्टीमॉडल इंटिग्रेशन विभागाचे डीजीएम श्री. महेश मोरोने यांची उपस्थिती होती. श्री. महेश मोरोने यांनी मेट्रो रेल्वे प्रणालीचे नागरी जीवनायापनात महत्त्व आणि आवश्यकता यावर प्रकाश टाकला. टेक इट आयडियाज इनोव्हेशन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेडचे सीईओ श्री. प्रकाश शुक्ला यांनी रोजगारक्षमता वाढवण्याच्या दृष्टीने कौशल्यांवर भाष्य केले. अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी अध्यक्षीय भाषण केले.

करिअरमधील चांगल्या संधींसाठी इंटर्नशिप, एक्स्पोजर आणि कौशल्य वर्धनाची गरज यावर त्यांनी भाष्य केले. डॉ. विकास जांभुळकर यांनी दोन्ही विषयांवर प्रास्ताविक केले आणि सुरक्षित, पर्यावरणपूरक मास रॅपिड वाहतुकीची गरज सांगितली. तंत्रज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेत कौशल्य वाढवण्याची गरजही त्यांनी मांडली. कार्यक्रमाचे संचालन करीत आभार डॉ. प्रमोद काणेकर यांनी मानले. या कार्यक्रमात अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सत्यप्रिय इंदुरवाडे, लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ. जितेंद्र वासनिक, तत्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. कदम , डॉ भूपेंद्र घरत, प्रा. किशोर नैताम, प्रा. पाटील यांची उपस्थिती होती.

---






## सर्जनशील लेखक समाज जीवनाचा भाष्यकार
## अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे
## अध्यक्ष डॉ रवींद्र शोभणे यांचे प्रतिपादन

सर्जनशील लेखक समाज जीवनाचा भाष्यकार असतो, असे प्रतिपादन ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागात गुरुवार, दिनांक १८ जानेवारी २०२४ रोजी मराठीतील ज्येष्ठ कथाकार व कादंबरीकार डॉ. रवींद्र शोभणे यांचे 'सर्जनशील साहित्याची निर्मिती' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी डॉ. शोभणे मार्गदर्शन करीत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानव्य विज्ञान विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी होते. इंग्रजी विभाग प्रमुख डॉ संजय पळवेकर व राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ विकास जांभूळकर हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. रवींद्र शोभणे यांची अंमळनेर येथे होऊ घातलेल्या ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याने मराठी विभागातर्फे भावपूर्ण सत्कार करण्यात आला. अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांच्या हस्ते व मराठी विभागप्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. संजय पळवेकर, राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. विकास जांभुळकर, समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. अशोक बोरकर, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. धीरज कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत ज्येष्ठ कथाकार, कादंबरीकार व समीक्षक डॉ. रवींद्र शोभणे यांचा हृद्य सत्कार करण्यात आला. डॉ. रवींद्र शोभणे यांनी 'सर्जनशील साहित्याची निर्मिती' या विषयावरील व्याख्यानामधून मराठीतील सर्जनशील साहित्याची निर्मितिप्रक्रिया सविस्तर स्वरूपात उलगडून दाखवली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी मराठी साहित्य आणि सामाजिक शास्त्रे यांच्यातील परस्परसंबंधावर विचार व्यक्त केले. डॉ रवींद्र शोभणे यांचे साहित्य मराठी साहित्यविश्वाला समृद्ध करणारे असल्याचे विचार त्यांनी आपल्या भाषणातून मांडले. इंग्रजी विभागप्रमुख डॉ. संजय पळवेकर यांनी डॉ. रवींद्र शोभणे यांचे साहित्य विदर्भातील लोकांसाठी अभिमानाचा विषय असल्याचे प्रतिपादन केले. राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांनी भाषा आणि राजकारण यांचातील अनुबंध उलगडून दाखवला. या व्याख्यान कार्यक्रमाचे प्रास्ताविकपर मनोगत मराठी विभागप्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी व्यक्त केले. आपल्या प्रास्ताविकातून त्यांनी सद्यस्थितीमधील सर्जनशील साहित्याचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच त्यांनी अतिथी वक्ता व सत्कारमूर्ती डॉ. रवींद्र शोभणे यांचे साहित्यिक योगदान उलगडून दाखवले. या व्याख्यान व सत्कार कार्यक्रमाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मानव्य विज्ञान विद्याशाखेतील विविध विषयांचे विभाग प्रमुख व प्राध्यापक तसेच मराठी विभागातील विद्यार्थी व संशोधक बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये प्रा. सुजित जाधव, प्रा. सपन नेहरोत्रा यांच्यासह विविध मराठी विषयाचे प्राध्यापक लक्षणीय संख्येने उपस्थित होते. संचालन प्रा. अमित दुर्योधन यांनी केले तर आभार डॉ. अमृता इंदूरकर यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी मराठी विभागातील प्राध्यापक हर्षल गेडाम, उमेश डोंगरवार, विभागातील संशोधक समीर कुमरे यांनी विशेष परिश्रम घेतले.




## समाजशास्त्र विभागात डॉ. अनंत- लता लाभसेठवार व्याख्यानमाला

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाद्वारे डॉ. अनंत व लता लाभशेठवार व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. व्याख्याता म्हणून नालंदा अकादमी वर्धा येथील श्री. अनुप कुमार, दानदाते डॉ. अनंत व लता लाभशेठवार विभाग प्रमुख डॉ. अशोक बोरकर, दानदाते लाभशेठवार कुटुंब या व्याख्यानमालेत उपस्थित होते.

व्याख्यानमालेत श्री. अनुप कुमार यांनी व्यक्ती जनुकांमुळे नव्हे तर त्याच्यात आत्मविश्वास निर्माण केल्यास व तसे सांस्कृतिक वातावरण दिल्यास घडतो अशी मांडणी केली. त्यांच्या अकादमीत ग्रामीण दलित युवक- युवतींना त्यांनी २०१३ पासून कसे प्रयत्न करून घडवले. देशाच्या मानवशास्त्राशी संबंधित संस्थांमध्ये कसे पाठवले हे त्यांनी सह-उदाहरण मांडले. ग्रामीण विद्यार्थी टीआयएसएस, अजीम प्रेमजी, जेएनयू सारख्या संस्थांमध्ये शिक्षण घेत आहेत. काही विद्यार्थी कमवत देखील आहेत. त्यांच्या पे बॅक टू सोसायटी मुळे अडचणींवर मात करून सुद्धा नालंदा अकादमी आपले कार्य करत आहे, असे अनुप कुमार यांनी सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी योग्य वातावरण मिळाल्यास व्यक्तीच्या कर्तुत्वास चालना मिळते, सांस्कृतिक अडथळे यातून दूर करायला हवेत असे सांगितले.

मानव्य विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी समारोपीय भाषण करीत आभार मानले. समाजशास्त्र व समाजकार्याच्या आचार्य पदवीसाठी कार्यरत विद्यार्थी तसेच विभागाचे विद्यार्थी व शिक्षक आवर्जून उपस्थित होते. विभाग प्रमुख समाजशास्त्र.

## प्रवास व पर्यटन विभागातर्फे "नेचर ट्रेल"






राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रवास व पर्यटन विभागातर्फे विभागात पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना नागपूर शहरातील जैवविविधतेची ओळख व्हावी म्हणून आज शनिवार, दिनांक २० जानेवारी २०२४ रोजी "गोरेवाडा बायोडायर्व्हसीटी पार्क" येथे "नेचर ट्रेल" चे आयोजन करण्यात आले.

नागपूर शहरातील जैवविविधतेचे पर्यटनाच्या दृष्टीने असलेले महत्व ओळखून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या "नेचल ट्रेल" ला विभागातील विद्यार्थ्यांचा, शिक्षकांचा व नागपूर वासियांचा मोठा प्रतिसाद मिळाला. या "नेचर ट्रेल" ला डॉ. रामदास बागडे यांनी मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी नागपूर परिसरात मुख्यत्वे आपल्या घरा जवळ व रानात आढळणारे पक्षी व प्राणी तसेच विशेषता जलचर प्राणी व पक्षी, त्यात असणारा नाजुकसा फरक, स्थलांतरीत पक्षांचे नागपूर परिसरातील वास्तव्य, कालक्रम व उपक्रम, अलिकडे विशेष दिसणारे पक्षी, पक्षांचे रानाकडून मनुष्य निवासाकडे स्थलांतर इत्यादी विषयांचा मागोवा घेतला. त्यांनी नागपूर परिसरातील जलाशयात आढळणाऱ्या किटक घटकाविषयीही सांगीतले. पर्यटनाच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या भामपूर परिसरातील "गोरेवाडा बायोडायर्व्हसीटी पार्क" व येथील जैवविविधतेची विभागातील विद्यार्थ्यांना व नगर वासीयांना ओळख व्हावी तसेच त्यांचे जतन व्हावे म्हणून अशा प्रकारचे उपक्रम नेहमी राबवीण्यात यावे अशो मागणी "नेचर ट्रेल" मध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी केले.



## विद्यापीठात नेताजी सुभाषचंद्र बोस व स्व. बाळासाहेब ठाकरे जयंती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात नेताजी सुभाष चंद्र बोस व स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीचा कार्यक्रम पार पडला. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवन येथे मंगळवार, दिनांक २३ जानेवारी २०२४ रोजी आयोजित कार्यक्रमात माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली नेताजी सुभाषचंद्र बोस व स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस माल्हार्पण करण्यात आले. यावेळी सामान्य प्रशासन विभागातील शैलेश राठोड, चंद्रमणी मिश्रा, नितीन खरबडे, कवडू भोयर, आसिफ शेख, विलास कोल्हे, कार्तिक हरडे यांच्यासह अन्य कर्मचारी उपस्थित होते.

# महाप्राण बॅ. जोगेंद्रनाथ मंडल यांची १२० वी जयंती




राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व विचारधारा यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दिनांक २९ जानेवारी २०२४ रोजी महाप्राण जोगेंद्रनाथ मंडल यांची १२० वी जयंती साजरी करण्यात आली. त्यानिमित्य डॉ. संजय गजभिये यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख व डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागाचे विभाग प्रमुख डॉ. अविनाश फुलझेले होते.

अध्यक्ष डॉ. अविनाश फुलझेले म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे घटना समिती समोरील पहिले भाषण राष्ट्रवादाने ओतप्रोत भरलेले असल्यामुळे काँग्रेस चे सभासदही त्यांचा विरोध करू शकले नाहीत. महाप्राण जोगेंद्रनाथ मंडलांच्या सुनियोजित रणनितीमुळे

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा घटना समितीतील प्रवेश शक्य झाला. त्यांच्या या कार्यामुळे देश त्यांना विसरणार नाही. कार्यक्रमामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागातील डॉ. रमेश शंभरकर, डॉ. सरोज डांगे, डॉ दहाट व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







## आयआयटी प्रमाणे भूगर्भशास्त्र विभागात आधुनिक लॅब -कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या शुभहस्ते शुभारंभ

आयआयटी प्रमाणे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागात आधुनिक तंत्रज्ञानयुक्त लॅब सज्ज झाली आहे. आधुनिक तंत्रज्ञान युक्त लॅबचा शुभारंभ माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या शुभहस्ते फित कापून करण्यात आला.भूगर्भशास्त्र विभागात हा कार्यक्रम शुक्रवार, दिनांक २६ जानेवारी २०२४ रोजी पार पडला. मॉड्युलर ऑप्टिकल लॅबमध्ये मायक्रोस्कोपखाली असलेली स्लाईड मोठ्या स्क्रीनवर दाखवीत विद्यार्थ्यांना शिकविणे शक्य झाले आहे.

माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्यासह यावेळी कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, डॉ. प्रशांत कडू, विभाग प्रमुख डॉ. कीर्तीकुमार रणदिवे, ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक डॉ. विजय खंडाळ यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कुलगुरू डॉ. चौधरी यांनी मॉड्युलर ऑप्टिकल लॅबचे उद्घाटन केले. त्यानंतर येथील मेट्यामॉर्फिक पेट्रोलॉजी लॅब, इग्निअस पेट्रोलॉजी लॅब, मिनरलॉजी लॅब, सेडीमेंट्री पेट्रोलॉजी लॅब, ओअर जिओलॉजी लॅबची पाहणी केली. विविध प्रकारचे मिनरल्स आणि दगडांचे छोटे नमुने तयार करीत त्याच्या तपासणीची आयआयटीप्रमाणे अत्याधुनिक प्रयोगशाळेचा कुलगुरू डॉ. चौधरी यांच्या शुभहस्ते शुभारंभ करण्यात आला. प्रयोगशाळेत दगडाचे नमुने तयार करीत तपासणीचे प्रात्यक्षिक यावेळी दाखविण्यात आले. सोबतच विभागात नव्याने तयार करण्यात आलेल्या एल. जी. ग्वालानी स्मृती सभागृहाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी विभागातील अधिसभा सदस्य श्री याकूब शेख, विशेष कार्य अधिकारी श्री प्रदीप बिनीवाले, उपकुलसचिव डॉ. रमण मदणे, डॉ. अनिल पोफरे, डॉ. सुमेध हुमणे, डॉ. वंदना सामंत, मारुती बोरकर, राजेश लांडगे, सुचित्रा मेंढे, साईली ढोक, अर्चना राठोड, योगेश मुरकुटे अभय वर्हाडे, हेमंत खंडारे, मनीष देशमुख, भुजंग मांजरे, समया हुमणे, कृतिका जांगडे, प्रतीक गोडबोले, कौस्तुभ देशपांडे यांची उपस्थिती होती.

**संशोधनास मदत :** भूगर्भशास्त्र विभागामध्ये नव्याने सुरू करण्यात आलेल्या अत्याधुनिक प्रयोग शाळेचा मेट्रोलॉजी, मायनिंग तसेच भूगर्भशास्त्र या शास्त्रांमध्ये संशोधन करण्यास मोठी मदत होणार आहे. अशा प्रकारची आधुनिक प्रयोगशाळा तयार करणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ हे महाराष्ट्रातील एकमेव विद्यापीठ ठरले आहे. ही सुविधा केवळ आयआयटीमध्ये उपलब्ध आहे. अत्याधुनिक प्रयोगशाळेचा उपयोग सिमेंट उद्योग, स्टील उद्योग यासह विविध प्रकारच्या चाचण्यांसाठी होणार आहे.

**तीन हजारांपेक्षा अधिक नमुन्यांचा संग्रह :** भूगर्भशास्त्र विभागामध्ये तयार करण्यात आलेल्या मॉड्युलर ऑप्टिकल लॅबमध्ये ३ हजारांपेक्षा अधिक मिनरल्स, रॉक्स, फॉसिल्स आदी नमुन्यांचा संग्रह करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना या विषयाचा अभ्यास करताना अधिकाधिक माहिती या प्रयोगशाळेतून प्राप्त होणार आहे. शिवाय या प्रयोगशाळेमध्ये लावण्यात आलेले मायक्रोस्कोप हे जर्मनी येथून आणण्यात आले आहे. या मायक्रोस्कोपच्या मदतीने मोठ्या स्क्रीनच्या आधारे विद्यार्थ्यांना अधिक सूक्ष्म बाबींचा अभ्यास करता येणार आहे. शिवाय मायक्रोस्कोपमधील छायाचित्र मोठ्या स्क्रीनवर दिसणार असल्याने प्रात्यक्षिकांसह शिकवणे देखील सोपे होणार आहे.

# विधी महाविद्यालयात विधी मंथन कार्यशाळा



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय व विश्वमंथन रिसर्च फाउंडेशनच्या वतीने विधी मंथन कार्यशाळा सिविल लाईन येथील चिटणवीस सेंटर येथे घेण्यात आली. महाराष्ट्र व छत्तीसगड राज्यातील विविध विधी महाविद्यालयातील १६ संवर्गात १२० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

उद्घाटन कार्यक्रमात स्वामी ज्ञान गमयानंदजी महाराज यांनी आशीर्वचन दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवीशंकर मोर यांनी केले. सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता श्री. शेखर नफाडे हे यावेळी उपस्थित होते. कार्यशाळेत एकूण १४ सत्रामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता ॲड. शेखर नफाडे, ॲड. सुधाकर आव्हाड, सेवानिवृत्त न्यायाधीश आर.सी. चव्हाण, डॉ. सीमा सिंग (नवी दिल्ली), डॉ. मोनिका अरोरा, प्रो. स्टॅलिन, सई तमानेकर, हेमन हिंगमिरे, कुलगुरू डॉ. मधुसूदन पेन्ना यांनी कार्यशाळेत न्याय शास्त्रावर मार्गदर्शन केले. अन्य अतिथींनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स, संविधानिक नीतीमूल्ये, विधी क्षेत्रातील भविष्य यासह विविध विषयांवर मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. सर्वोच्च न्यायालयातील अधिवक्ता ॲड. विष्णूशंकर जैन यांनी समारोपीय कार्यक्रमात वक्फ बोर्ड कायदाच्या परिणामावर विस्तृत चर्चा केली. डॉ. रवीशंकर मोर यांनी संपूर्ण चर्चासत्रामध्ये काम सांभाळले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय, एमएनएलयू नागपूर व सिम्बॉयसिस विधी महाविद्यालय यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये मदत केली.



# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात शुक्रवार दिनांक १२ जानेवारी २०२४ रोजी कार्यक्रम पार पडला. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य प्रशासन विभागाचे अधिक्षक श्री गणेश कुमकुमवार व शताब्दी महोत्सव कक्षाचे विशेष कार्य अधिकारी श्री प्रदीप बिनीवाले यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना माल्हार्पण करण्यात आले. यावेळी शैलेश राठोड, मनोज मोरे, कार्तिक हरडे, नरेंद्र पवार, रुपेश आत्राम, अनिल खरे, कवडू भोयर, आसिफ शेख यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.




## विद्यार्थ्यांनी जाणून घेतली संसदीय कार्यप्रणाली -विधी महाविद्यालयात छात्र संसदेचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संचालीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयामध्ये बुधवार दिनांक २४ जानेवारी २०२४ रोजी प्राचार्य डॉ. रविशंकर मोर ह्यांच्या अध्यक्षतेखाली छात्र संसदेचे आयोजन करण्यात आले होते. ह्या आयोजनामागील उद्दिष्ट हे सांसदीय कार्यप्रणाली जाणून घेणे तसेच विद्यार्थ्यांमधील नेतृत्व, वक्तृत्व तसेच इतर कलागुण विकसीत करणे होते.

छात्र संसंदेमध्ये नुकताच पारित झालेला भारतीय न्याय संहिता २०२३ चा मसुदा चर्चेसाठी ठेवण्यात आला होता. कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून नगरसेविका डॉ. परिणिता फुके आणि विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य श्री वामनराव तुर्के उपस्थित होते. संसदीय सभापती म्हणून डॉ. विजयप्रताप तिवारी (प्राध्यापक एमएनएलयु नागपूर) ह्यांनी मुख्य भूमिका अतिशय उत्कृष्टपणे निभावली.

कार्यक्रमाचे परीक्षण श्री वामनराव तुर्के, डॉ. प्रविणा खोब्रागडे आणि माया सन्याल यांनी केले. कार्यक्रमामध्ये जवळपास सत्तर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रा. अर्चना प्रांजळे आणि डॉ. हर्षदा वाळके ह्यांनी शिक्षक समन्वयक म्हणून सहकार्य केले. तसेच आषुतोष नारायण व शौर्यमान सिंग बिष्ट ह्यांनी विद्यार्थी समन्वयक म्हणून सहकार्य केले.




## प्रवास व पर्यटन विभागातर्फे "पर्यटन पर्व" उत्साहात

भारतातील विविध ऐतिहासिक, धार्मिक, साहसी, शास्वत व गड-किल्ले पर्यटनाच्या दृष्टीने असलेले महत्व ओळखून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रवास व पर्यटन विभागातर्फे विभागात पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पर्यटन दिवस अनुषंगाने बुधवार, दिनांक २४ जानेवारी २०२४ रोजी "पर्यटन पर्व"चे आयोजन करण्यात आले.

या "पर्यटन पर्व" चे उद्घाटन विभाग प्रमुख डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे यांनी केले. यात विभागातील विद्यार्थ्यांनी पर्यटन प्रदर्शनीचे आयोजन केले आहे, त्यात त्यांनी विविध राज्यातील मुख्यत्वे गुजरात, राजस्थान, महाराष्ट्रातील गडकिल्ले, ओडिसा, अंदमान, उत्तर-पूर्व, केरळ शिवाय अयोध्या येथील पर्यटन पॅकेजचा समावेश केला आहे. या पॅकेजमध्ये विविध पर्यटन स्थळांची प्रवास सुची, विविध स्थळांच्या विस्तृत माहिती तसेच माहिती पत्रका यांचा समावेश केला आहे. या पर्यटन पॅकेज प्रदर्शनाला विद्यापीठ परिसरातील विविध विभाग व नागपूरातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भेट दिली व विविध राज्यातील पर्यटन स्थळाविषयी माहिती जाणून घेतली. प्रवास व पर्यटन विभागातील या पर्वास सफल करण्याकरीता विभागातील शिक्षक डॉ. अरविंद उपासनी, डॉ. अमरदीप बारसागडे, प्रा. मंजुषा डोंगरे, प्रा. भाग्यश्री हिरादेवे, प्रा. शोभना मेश्राम व प्रा. परिनल सुरडकर यांनी परिश्रम घतले.



## प्रवास व पर्यटन विभागातर्फे "हेरिटेज वॉक"

राष्ट्रीय पर्यटन दिवस सप्ताह निमित्त व नागपूर शहरातील गोंड व भोसले काळातील इमारती व मंदिरांचे पर्यटनाच्या दृष्टीने असलेले महत्व ओळखून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रवास व पर्यटन विभागातर्फे विभागात "हेरिटेज वॉक" आयोजित करण्यात आला. पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना नागपूर शहरातील परमार, यादव, भोसले व गोड काळातील वास्तूंची ओळख व्हावी म्हणून व राष्ट्रीय पर्यटन दिवस सप्ताह सोहळा निमित्त "हेरिटेज वॉक" शनिवार, दिनांक २७ जानेवारी २०२४ रोजी पार पडला. या "हेरिटेज वॉक" ला विभागातील शिक्षक व पुरातत्वज्ञ डॉ. अमरदिप बारसागडे यांनी हेरिटेज वॉकला मार्गदर्शन केले. "हेरीटेज वॉक" ची सुरूवात शुक्रवारी तलावाच्या दक्षिण-पूर्व कोप-यातील गणेश मंदिरापासून सकाळी ७.०० वाजता झाली. महाल परिसरातील गांधी दरवाजा (पुर्वीचा जुम्मा दरवाजा), कोठी रोड वरील कोठी, कोलोनियल स्थापत्याचे निदर्शक असलेला देशमुख वाडा, भोसले वाडा, रुख्मीणी मंदिर, हेगडेवार भवन इत्यादीं वास्तू व त्यांचे स्थापत्यीय व कला अवशेष, नक्षिकाम इत्यादी बघुन वॉकची समाप्ती झाली. पर्यटनाच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या या प्राचीन, ऐतिहासिक व महत्वपूर्ण वास्तुची प्रवास व पर्यटनाच्या विद्यार्थ्यांना ओळख व्हावी व त्यांचे जतन व्हावे म्हणून अशा प्रकारचे उपक्रम नित्यनेमाने राबवीण्यात यावे अशी मागणी "हेरीटेज वॉक" मध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी केली.







## प्रवास व पर्यटन विभागाव्दारे राष्ट्रीय पर्यटन दिवस सोहळा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महात्मा ज्योतीबा फुले शैक्षणिक परिसरातील प्रवास व पर्यटन विभागाद्वारे विभागाच्या नवीन इमारतीत राष्ट्रीय पर्यटन दिवस सोहळा गुरुवार, दिनांक २५ जानेवारी २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आला.

राष्ट्रीय पर्यटन दिवस सोहळ्यात क्लीक युवर ट्रिप नागपूरचे ऑपरेशन मॅनेजर प्रा. निलेश लांजेवार यांची उपस्थिती होती. सोहळ्याचे उद्घाटन करताना निलेश लांजेवार यांनी भारत सरकारच्या पर्यटन विभागाने दिलेल्या थीम नुसार सस्टेनेबल जर्नीज, टाईमलेस मेमोरीज (शास्वत पर्यटन व अविस्मरणीय क्षण)' दृष्टिने पर्यटन आचसायाला विदर्भात भरपूर वाव आहे, असे सांगीतले. पर्यटन व्यवसायातील विविध पैलूंवर त्यांनी मार्गदर्शन केले. ते पुढे म्हणाले की, पर्यटन व्यवसाया करिता नवीन उद्योगी व आधुनिक विचाराचे तरुण-तरूणी पुढे यायला पाहीजे. विभाग प्रमुख डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगीतले की, १९८५ मध्ये प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्व विभागाने सुरू केलेल्या या विभागाने विदर्भातील पर्यटन व्यवसायाला उत्तेजीत करणारे उद्योगी निर्माण केले. पर्यटन एजन्सी निर्मिती, व्याघ्र पर्यटन, साहसी पर्यटन, ग्राम पर्यटन इत्यादी विषय विदर्भातील पर्यटनाशी सबंधीत असून त्यांचा अंतर्भाव अभ्यासक्रमात असल्याचे त्यांनी सांगीतले. विभागाने राष्ट्रीय पर्यटन सप्ताह साजरा करताना गोरेवाडा येथे नेचर ट्रेल, नागपूर शहरातील महाल परिसरात हेरीटेज वॉक, भारतातील विविध राज्यातील पर्यटन स्थळांच्या पर्यटन नियोजनाच्या यादींचे विभागील विद्यार्थ्यांनी 'पर्यटन पर्व' च्या रूपाने दोन दिवसीय प्रदर्शन इत्यादी उपक्रम राबवून विभागाच्या विद्यार्थ्यांना विषयात तरबेज केल्याचे त्यांनी सांगीतले.

दुसरे वक्ते श्री. प्रदीप रामटेके यांनी पर्यटन क्षेत्रातील आपले अनुभव सांगतांनी पर्यटकांची पर्यटनातुन स्वप्नपूर्ती व्हावी असे सांगीतले. विभागातील विद्यार्थ्यांनी उपरोक्त 'थीम' वर आधारीत विदर्भातील पर्यटन स्थळांना केंद्रीत धरून आपल्या संशोधन पेपरची प्रस्तुती केली. या नंतर उपस्थित महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे सहायक संचालक श्री प्रशांत सवाई यांनी शासकीय दृष्टीकोनातुन प्रवास व पर्यटन क्षेत्रात असलेल्या योजना व त्यांचे लाभ, सद्याचे पर्यटक निसर्ग आणि ग्रामीण पर्यटनाकडे आकर्षीत होत आहेत या विषयावर संबोधन केले. तसेच विद्यार्थ्यांशी पर्यटन क्षेत्रातील विविध प्रश्नावर चर्चा केली. राष्ट्रीय पर्यटन दिवसाचे संचालन कु. आफीन अंसारी यांनी केले. मान्यवरांचा परिचय श्री. रामदास बागडे यांनी केला, तर आभार श्री. आदित्य झाडे यांनी मानले. राष्ट्रीय पर्यटन दिवसाला यशस्वी करण्यासाठी विभागातील शिक्षक डॉ. अरविंद उपासनी, डॉ. अमरदीप बारसागडे, प्रा. मंजुशा डोंगरे, प्रा. भाग्यश्री हिरादेवे, प्रा. परिमल सुराडकर, प्रा. शोभना मेश्राम, तसेच प्रवास य पर्यटनातील एम.ए. प्रथम व व्दितीयच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या जलतरण संघाची घोषणा
## अ.भा. आंतरविद्यापीठ जलतरण स्पर्धेत होणार सहभागी

कत्तनकुलथुर येथील एसआरएम इंस्टीट्यूट ऑफ सायंस अँड टेक्नॉलॉजी यांच्या अधिपत्याखाली होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ जलतरण स्पर्धेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरुष व महिला जलतरण संघाची घोषणा विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी नुकतीच केली आहे. काही दिवसांपूर्वी पार पडलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ जलतरण स्पर्धेत दमदार कामगिरी करीत विद्यापीठाच्या जलतरणपटूंनी अ. भा. आंतरविद्यापीठ जलतरण स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले आहे.

**विद्यापीठ संघ -** स्नेहल जोशी (शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय), संजना जोशी (एलएडी कॉलेज), रिद्धी परमार (डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज), अक्षता झाडे (जीएच रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालय). **पुरुष संघ -** यश गुल्हाणे (जीएच रायसोनी अभियांत्रिकी कॉलेज), साहिल तराळे (बी. डी. कॉलेज वर्धा), ध्रुव मिश्रा (डॉ. बाबासाहेब आंबेडकर इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट), तुषार परमार (डी. एन. कॉलेज), सन्मय रुहीकर (एस. बी. जैन मॅनेजमेंट इन्स्टिटयूट नागपूर). प्रशिक्षक - अमोल रायपूरकर, लोकेश गभणे, व्यवस्थापक - तृप्ती जोध, अथर्व भोसले.



## फुटाळा परिसरात मतदार जागृती कार्यक्रम
## विद्यापीठ पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागाच्या वतीने शहरातील फुटाळा परिसरात मतदार जनजागृती अभियान राबविण्यात आले. फुटाळा परिसरात विद्यार्थ्यांनी प्रभातफेरी काढत सोमवार, दिनांक २९ जानेवारी २०२४ रोजी मतदार जनजागृती केली. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांच्या नेतृत्वात मतदार जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला. विभागातील प्रा. किशोर नैताम, विद्यार्थी पंकज सोमकुंवर, सुनिता मोहतकर, सिरत यांनी मतदानाबाबत नागरिकांना माहिती दिली. विभागातील २५ विद्यार्थ्यांनी प्रभात फेरीत सहभाग घेत मतदार जागृती कार्यक्रम राबविला. यावेळी प्रा. प्रियंका गावडे यांच्या सहविद्यार्थी उपस्थित होते.



## शिक्षणाला रोजगाराभिमुख करणे काळाची गरज - कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी
## जे. एम. पटेल महाविद्यालयात एनईपीवर प्राचार्यांची बैठक

गोंदिया शिक्षण संस्थेव्दारा संचालित भंडारा येथील जे. एम. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० च्या क्रियान्वयनाच्या दृष्टीने जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्यांची एक महत्वाची बैठक पार पडली. बैठकीला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी यांनी मागदर्शन केले. विचारपीठावर आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, शताब्दी समारोह समितीचे समन्वयक डॉ. एस. व्ही. कसबेकर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विकास ढोमणे प्रामुख्याने उपस्थित होते. आपल्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. विकास ढोमणे यांनी महाविद्यालयांच्या विविध वैविध्यपूर्ण उपक्रमासांठी विद्यापीठाने जे. एम. पटेल महाविद्यालयाला अग्रक्रम दिल्याबद्दल कुलगुरुंचे आभार मानले. बैठकीला संबोधित करताना कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी यांनी विद्यापीठाच्या शताब्दी सोहळ्यानिमित्य आयोजित विविध उपक्रमांची व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० च्या विविध पैलुंवर प्रकाश टाकला. या धोरणाच्या निमित्ताने निर्माण होणारी आव्हाने आणि संधी या संबधी त्यांनी उपस्थितांशी विस्तृत चर्चा केली. या प्रसंगी डॉ. प्रशांत कडू यांनी ज्या गावांमध्ये विद्यापीठाव्दारे विविध उपक्रम राबविले जात आहेत त्या गावातील सरपंचाशी संवाद साधून एक आढावा बैठक घेतली. कार्यक्रमाचे संचालन करीत आभार महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. कार्तिक पनिक्कर यांनी मानले. या प्रसंगी जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य व प्रतिनिधी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. भिमराव पवार, डॉ. रोमी बिश्ट, प्रा. अमोल सातपुते, डॉ. भावना राय आदिंचे मोलाचे सहकार्य लाभले.

नवराष्ट्र

# नेहा, निखिल ठरले सर्वोत्कृष्ट ॲथलिट

## शिवाजी विद्यापीठ अव्वल, नागपूर विद्यापीठाला तिसरे स्थान

नागपूर. राष्ट्रीय स्पर्धेत 23 वर्षाखालील वयोगटांतर्गत 400 मीटर हर्डल्स शर्यतीत ब्राँझपदक जिंकणारी नागपूर विद्यापीठाची नेहा ढबाले आणि ज्युनिअर राष्ट्रीय स्पर्धेत चारशे मीटर शर्यतीत ब्राँझपदक जिंकणारा मुंबई विद्यापीठाचा निखील ढाके यांनी रौप्य महोत्सवी राज्य आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेत सर्वोत्कृष्ट ॲथलिटचा पुरस्कार जिंकला. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरने पुरुष व महिला गटात विजेतेपद पटकावताना सर्वसाधारण विजेतेपदही मिळविले. यजमान नागपूरला तिसरे स्थान मिळाले.

नेहाला महिलांमध्ये सर्वाधिक 938 तर निखिलला 961 गुण मिळाले. महिलांमध्ये शिवाजी विद्यापीठाने 53 गुणांसह बाजी मारली. नागपूरला 45 गुणांसह दुसरे व पुणे विद्यापीठाला 41 गुणांसह तिसरे स्थान मिळाले. पुरुषांत शिवाजी विद्यापीठाने 71 गुणांसह बाजी मारली. पुण्याला 55 गुणांसह दुसरे व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूरने 34 गुणांसह तिसरे स्थान मिळविले. यामुळे शिवाजी विद्यापीठाने 124 गुणांसह सांघिक विजेतेपद पटकाविले. पुण्याला 96 गुणांसह दुसरे व नागपूरला 72 गुणांसह तिसरे स्थान मिळाले.

### आदर्शचे दुहेरी यश

शंभर मीटर शर्यत जिंकून वेगवान धावपटूचा मान मिळविणाऱ्या आदर्श भुरेने दोनशे मीटरची शर्यत 21.80 सेकंदात जिंकून दुहेरी यश संपादन केले. मुंबई विद्यापीठाच्या निखील ढाकेला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. त्याने 21.81 सेकंद अशी वेळ दिली. मात्र, दोघांमधून सुवर्णपदकाचा फैसला करताना फोटो फिनीशचे सहकार्य घ्यावे लागले. बरीच सल्लामसलत झाल्यानंतर आदर्शला विजयी घोषित करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या अजय खाडेला ब्राँझपदक मिळाले. महिलांत हा मान सोलापूरच्या आकांक्षा गावडेने मिळविला.



### रिले शर्यतीत नागपूरची बाजी

महिलांच्या 4-400 मीटर रिले शर्यतीत नागपूरच्या महिलांनी बाजी मारली. भुवनेश्वरी मसराम, स्वाती उईके, चैताली बोरेकर व नेहा ढबालेचा समावेश असलेल्या नागपूर संघाने 3 मिनीट 59.89 सेकंद अशी वेळ नोंदवली. शिवाजी विद्यापीठाला रौप्य तर मुंबई विद्यापीठाला ब्राँझपदकावर समाधान मानावे लागले. पुरुषांत शिवाजी विद्यापीठाचा संघ सुवर्णपदकाचा मानकरी ठरला. स्वामी रामानंद तिर्थ विद्यापीठ नांदेडने रौप्य व मुंबईने ब्राँझपदक पटकाविले.

Orange City Plus Edition
16 January 2024 Page No. 3
epaper.navarashtra.com

---

# 'मल्टीपर्पज इनडोर स्टेडियम' संतरानगरी में होगा साकार

नागपुर विद्यापीठ के शताब्दी महोत्सव के अवसर पर निर्मित

## स्टेडियम के लिए मिली 20 करोड़ की निधि



नागपुर। महाराष्ट्र का पहला मल्टी स्टोरी मल्टीपर्पज इनडोर स्टेडियम नागपुर में साकार होने वाला है। रवि नगर स्थित यूनिवर्सिटी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स में सुभेदार हॉल के पीछे जल्द ही यह भव्य इनडोर स्टेडियम का निर्माण किया जाएगा। राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विद्यापीठ के शताब्दी महोत्सव के अवसर पर सरकार द्वारा दी गई 100 करोड़ रुपये की निधि से इस स्टेडियम का निर्माण किया जाएगा। नागपुर विद्यापीठ ने इस स्टेडियम के लिए आनंद सारडा को आर्किटेक्ट नियुक्त किया है। तकनीकी समिति की देखरेख में यह महत्वाकांक्षी इनडोर स्टेडियम का निर्माण किया जाएगा।

### खेल प्रतियोगिताएं आयोजित हो सकेंगी

यह मल्टी स्टोरी मल्टीपर्पज इनडोर स्टेडियम दस खेलों के लिए होगा। दिन-रात 10 खेलों की प्रतियोगिता आयोजित की जा सकेगी तथा अभ्यास के लिए इनडोर स्टेडियम भी उपलब्ध रहेगा। इस इनडोर स्टेडियम में बास्केटबॉल, हैंडबॉल, टेबल टेनिस, जिम्नास्टिक, इनडोर कबड्डी, जूडो, वुशू, बैडमिंटन, स्क्वैश, कुश्ती आदि की सुविधाएं होंगी।

### खिलाड़ियों के म्युरल्स लगाए जाएंगे

मल्टी स्टोरी मल्टीपर्पज इनडोर स्टेडियम में कैफेटेरिया, मीटिंग हॉल, कॉन्फ्रेंस हॉल, प्रशासकीय कार्यालय, जिम्नेशियम और पर्याप्त पार्किंग क्षेत्र की सुविधाएं होंगी। इसके साथ ही स्टेडियम में अर्जुन, द्रोणाचार्य पुरस्कार विजेताओं और अंतरराष्ट्रीय पदक विजेता खिलाड़ियों के म्युरल्स लगाए जाएंगे।

---

लोकमत समाचार

# रिसर्च के क्षेत्र में नई उम्मीद जगाएगा रूसा का नया हाईटेक उपकरण

शाहनवाज आलम



नागपुर : रिसर्च और इनोवेशन के क्षेत्र में देश लगातार आगे बढ़ने के लिए प्रयासरत है. इसके लिए विभिन्न तरह के माध्यमों से रिसर्च और इनोवेशन को केंद्र सरकार द्वारा भी बढ़ावा दिया जा रहा है. ऐसे में आने वाले वर्ष में राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय में भी रिसर्च और इनोवेशन पर ज्यादा फोकस करने की योजना बनाई जा रही है. इसे देखते हुए नागपुर विश्वविद्यालय के रूसा सेंटर में कई हाईटेक उपकरण और सुविधाएं प्रदान की जा रही हैं. विश्वविद्यालय परिसर में 7 करोड़ रुपए की लागत से रूसा का नए भवन का कार्य पूर्ण हो चुका है. इस वर्ष रूसा सेंटर अपने नए भवन में शिफ्ट हो जाएगा. इसके साथ ही रूसा सेंटर में इस वर्ष नए और हाईटेक उपकरण जुड़ने जा रहे हैं. इन उपकरण के उपयोग से शोध करने वाले कॉलेजों और अन्य संस्थाओं को काफी आसानी होगी.

### नए साल में रूसा सेंटर में शामिल होंगे ये नए उपकरण, जानिए इनके उपयोग

1. **एक्सआरडी** — कम्प्यूटर के कार्ड फाइल सिस्टम में संग्रहीत विवर्तन डाटा के साथ परिणामी स्पेक्ट्रा की तुलना करके संरचना की पहचान की जा सकती है. यह क्रिस्टल संरचना का निर्धारण, अज्ञात चरण की पहचान, क्रिस्टलीयता का मात्रात्मक निर्धारण करता है. भौतिकी, रसायन विज्ञान, पदार्थ विज्ञान आदि क्षेत्रों में किया जाता है.
2. **टीजीए-डीटीए** — यह तकनीक किसी सामग्री के थर्मल व्यवहार का अध्ययन करने के लिए थर्मोग्रैविमेट्रिक विश्लेषण और डिफरेंशियल थर्मल विश्लेषण को जोड़ती है. टीजीए तापमान के साथ एक नमूने के द्रव्यमान में परिवर्तन को मापता है. डीटीए समान ताप उपचार के तहत नमूने और एक संदर्भ यौगिक के बीच तापमान के अंतर को मापता है.
3. **एफटी-आईआर** — एफटी-आईआर स्पेक्ट्रोमीटर है. जिसका फुटप्रिंट एक लैपटॉप के आकार का है. इसका उपयोग रासायनिक विश्लेषण के लिए किया जाता है. यह आपको कच्चे माल की गुणवत्ता नियंत्रण, मात्रा निर्धारण और सत्यापन करने में सक्षम करता है. स्पेक्ट्रम स्रोत से अवरक्त विकिरण नमूने से होकर गुजरता है.
4. **जीसी-एमएस** — जीसी-एमएस उपकरण एक विश्लेषणात्मक विधि है जो एक परीक्षण नमूने में विभिन्न पदार्थों की पहचान करने के लिए गैस क्रोमैटोग्राफी और मास स्पेक्ट्रोमेट्री की विशेषताओं को जोड़ती है. इसका उपयोग जीवन विज्ञान, औषधि विज्ञान, रसायन विज्ञान, भौतिक विज्ञान आदि क्षेत्रों में होता है.
5. **एलसी-एमएस** — विश्लेषणात्मक रसायन विज्ञान तकनीक पर आधारित है यह यंत्र जो तरल क्रोमैटोग्राफी (या एचपीएलसी) की भौतिक पृथक्करण क्षमताओं को मास स्पेक्ट्रोमेट्री (एमएस) की बड़े पैमाने पर विश्लेषण क्षमताओं के साथ जोड़ती है. यह जीवन विज्ञान, औषधि विज्ञान, रसायन विज्ञान, भौतिक विज्ञान आदि क्षेत्रों में कार्य करता है.

केंद्र सरकार की योजना राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रूसा) के तहत विश्वविद्यालय में रूसा केंद्र में नए उपकरण शामिल किए जा रहे हैं. साथ ही नए साल में रूसा यह केंद्र अपने नए भवन में शिफ्ट हो जाएगा. खास बात यह है कि नागपुर विश्वविद्यालय में संचालित रूसा का नया भवन पहला ऐसा केंद्र होगा, जहां शोध छात्रों, कॉलेजों और अन्य संस्थाओं को अति आधुनिक सुविधाएं व उपकरण प्रदान की जाएंगी.

- डॉ. उमेश ए पालीकुंडवार, केंद्र संयोजक/संचालक रूसा केंद्र, आरटीएम नागपुर विश्वविद्यालय

Apna Nagpur
Page No. 4 Jan 01, 2024
Powered by: erelego.com

---

पुण्यनगरी

# नागपूर विद्यापीठात वीर बालदिवसानिमित्त आदरांजली



नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात वीर बालदिवस आयोजित करण्यात आला. वीर बालदिवस हा श्रीगुरू गोविंद सिंग यांचे पुत्र साहिबजादास बाबा जोरावर सिंग आणि बाबा फतेह सिंग

---

LOKMAT TIMES

# RTMNU's RUSA Centre to promote research activity

SHAHNAWAZ AALAM
LOKMAT NEWS NETWORK

Nagpur: The country is continuously striving to move forward in the field of research and innovation. For this, research and innovation is also being promoted by the Central government through various means. In such a situation, in the coming year, a plan is being made to focus more on research and innovation in Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University (RTMNU). In view of this, many hi-tech equipment and facilities are being provided in the Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan (RUSA) Cen- … to be added to the RUSA Centre this year. The use of these equipment will greatly facilitate the colleges and other institutions doing research.

XRD is computer controlled and fully capable of providing qualitative and quantitative analysis for unknown powdered crystalline materials. The structure can be identified by comparing the resulting spectra with diffraction data stored in the computer's card file system. It helps in determination of crystal structure, identification of unknown phase, quantitative determination of crystallinity. It is used in fields like physics, chemistry, materials science, medicine, biological science etc.

TGA-DTA is a technique that combines thermogravimetric analysis (TGA) and differential thermal analysis (DTA) to study the thermal behavior of a material. TGA measures the change in mass of a sample with temperature, while DTA measures the temperature difference between a sample and a reference compound under the same heat treatment.

FT-IR spectrometer, whose footprint is the size of a laptop, is used for chemical analysis. It enables you to perform quality control, quantity determination and verification of raw materials. The infrared radiation from the spectrum source passes through the sample, some of that radiation is absorbed and some passes through the sample and is recorded by the detector.

GC-MS instrument is a high-end single quadrupole gas chromatograph mass spectrometer. GC-MS is an analytical method that combines the features of gas chromatography and mass spectrometry to identify different substances in a test sample.

Nagpur First
Page No. 4 Jan 02, 2024
Powered by: erelego.com

---

लोकमत

# सावित्री व ज्योतिबा फुले यांनी महिलांना ज्ञान परंपरेशी जोडले

## विमल थोरात : शाळा सुरू करण्यास १७५ व्या वर्षानिमित्त परिसंवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : महात्मा ज्योतिबा फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यात मुलींची पहिली शाळा सुरू करून महिलांना ज्ञानाच्या परंपरेशी जोडले, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. विमल थोरात यांनी केले.

ज्योती-सावित्री यांच्या पहिल्या मुलींच्या शाळेला १७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व विचारधारा विभागाच्यावतीने एकदिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय विभागाचे प्रमुख डॉ. प्रशांत कडू, डॉ. आंबेडकर अध्यासन विभागाचे प्रमुख डॉ. अविनाश फुलझेले उपस्थित होते.

प्रशांत कडू म्हणाले, महात्मा फुले यांनी १८ व्या वर्षी सामाजिक परिवर्तनाचे बिगुल फुंकले. या चळवळीत आज युवकांना सहभागी करावे लागेल. तरुण जबाबदारी घेण्यास तयार नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. प्रास्ताविक डॉ. अविनाश फुलझेले यांनी केले. संचालन भीमराव फुसे यांनी केले. दिलीपकुमार लेहगांवकर यांनी आभार मानले.



डॉ. आंबेडकर अध्यासन विभागातर्फे आयोजित परिसंवादात बोलताना विमल थोरात व व्यासपीठावर प्रशांत कडू व अविनाश फुलझेले.

### दिवसभर अनेक सत्रात परिसंवाद

परिसंवादाच्या उद्घाटनानंतर पहिल्या सत्रात पीडब्ल्यूएस महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रज्ञा बागडे यांनी फुले दांपत्याचे शैक्षणिक आंदोलन यावर प्रकाश टाकला. दुसऱ्या सत्रात वर्ध्याच्या यशवंत महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख प्रमोद नारायणे यांनी सामाजिक आंदोलनावर मार्गदर्शन केले. समारोप सत्रात डॉ. गौतम कांबळे व डॉ. रमेश शंभरकर यांनी मार्गदर्शन केले.

Nagpur Main
Page No. 5 Jan 02, 2024
Powered by: erelego.com

---

city भास्कर
दैनिक भास्कर bhaskarhindi.com नागपुर, मंगलवार, 2 जनवरी 2024 17

'फुले दंपति और समाज प्रबोधन आंदोलन' पर एक दिवसीय परिसंवाद

# फुले दंपति ने महिलाओं को ज्ञान की परंपरा से जोड़ा : डॉ. थोरात

## 175 वर्ष पूरे होने पर आयोजित किया गया कार्यक्रम, युवाओं को शामिल करना जरूरी

महात्मा ज्योतिबा फुले और ज्ञान ज्योति सावित्रीबाई फुले ने 1 जनवरी 1848 को लड़कियों के लिए पहला स्कूल शुरू कर महिलाओं को ज्ञान की परंपरा से जोड़ा। तथागत बुद्ध ने सबसे पहले महिला भिक्खुओं को संघ में शामिल कर इसकी शुरुआत की थी। वहां से शुरू हुई इस परंपरा को फुले दंपति ने पुनर्जीवित किया। डॉ. बाबासाहब आंबेडकर ने उसे आगे बढ़ाया। यह प्रतिपादन वरिष्ठ फुले आंबेडकरी साहित्यिक विचारक प्रा. डॉ. विमल थोरात ने व्यक्त किए।



मंच पर रहीं इनकी उपस्थिति

अनेक सत्र में हुआ परिसंवाद

अंग्रेजों ने भी किया सम्मान

संकल्प दिवस के रूप में मनाया जाएगा

---

# नागपूर विद्यापीठाच्या फुटबॉल संघाला विजेतेपद

सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. २ : मुंबई येथील एचएसएनसी विद्यापीठाच्या यजमानपदाखाली आयोजित पुरुषांच्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने विजेतेपद पटकाविले. या कामगिरीच्या जोरावर विद्यापीठाचा संघ अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

विजेतेपदासाठी झालेल्या चुरशीच्या लढतीत नागपूर विद्यापीठाने यजमान मुंबईचा ५-४ गोलने पराभव केला. तत्पूर्वी झालेल्या सामन्यात नागपूर विद्यापीठाने गुजरातच्या सरदार पटेल विद्यापीठाचा ३-१ ने, त्यानंतर पुण्याच्या डी. वाय. पाटील विद्यापीठाचा ९-० गोलने व गोव्याला टायब्रेकरमध्ये ४-२ अशा गोलने पराभव केला. विजयात महंमद ओवेस अशरफ, बादल सोरेन, आयुष केसरी, महंमद हंझाला, प्रीत कनोजिया व सुब्रतो दीपदास यांनी उल्लेखनीय योगदान दिले. संघाने हे यश प्रशिक्षक फ्रान्सिस डेव्हिड व संघव्यवस्थापक रॉड्रिक्स अँथोनी यांच्या मार्गदर्शनात मिळविले.

या कामगिरीबद्दल नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे व विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी संघाचे अभिनंदन केले.



नागपूर : पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेत विजेतेपद जिंकणारा नागपूर विद्यापीठाचा संघ.

---



पुरुष गटाच्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेचे विजेतेपद पटकावणारा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा संघ.

# विद्यापीठाचा फुटबॉल संघ पात्र

अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धा

म.टा. प्रतिनिधी, नागपूर

मुंबई येथील एचएसएनसी विद्यापीठाच्या यजमानपदाखाली घेण्यात आलेल्या पुरुष गटाच्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संघाने धडाकेबाज कामगिरी करीत पश्चिम विभागीय … संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले. चौथ्या लढतीत नागपूर विद्यापीठ संघाने गोव्याला टायब्रेकरमध्ये ४-२ अशा गोलने नमविले. या सामन्यात निर्धारित वेळेत दोन्ही संघाने प्रत्येकी दोन गोल नोंदविले …

---

LOKMAT TIMES

# RTMNU football team is Western division champ

## …efeat HSNC University 5-0

LOKMAT NEWS NETWORK
NAGPUR

Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University (RTMNU) has emerged winner in the western division inter university football tournament organised by HSNC University in Mumbai.

In a brilliant performance, the team of RTMNU crushed Mumbai (5-4) to win the title.

On the strength of this performance, the football team of Nagpur University qualified for the All India Inter-University Football Tournament to be held in Punjab, said director of sports at RTMNU, Dr Sharad Suryavanshi here.

Earlier, the men's team had a made strong start by winning the first match. In this match, it defeated Sardar Patel University of Gujarat 3-1.

Mohammed Ovis Ashraf of the winning team scored two goals while Badal Soren scored one goal. In the second match, the RTMNU team was given the walk over as the rival team did not appear. In the third match, RTMNU team made D Y of Patil University of Pune bite dust (9-0) as it continued its winning streak in the tournament.

Mohammed Ovis Ashraf Ayush Kesari, Md Hanzala scored two goals each while Preet Kanojia Subroto Deepdas and Badal Soren scored one goal each and contributed to the victory of RTMNU. In the fourth match, Nagpur University defeated Goa (4-2) in the tie breaker.

Both the teams scored two goals each in the stipulated time in this match. Therefore, the match was decided by a tiebreaker.

The team achieved this success under the guidance of coach Francis David and team manager Rodricks Anthony. Meanwhile Dr Sharad Suryavanshi has expressed joy over the performance of RTMNU. Vice-Chancellor Dr Subhash Chaudhary, pro-vice-chancellor Dr Sanjay Dudhe, registrar Dr Raju Hivase congratulated the team and wished it all the luck for the competition.



The RTMNU football team which has emerged champions in the Western division Inter-Univesity Football tournament.

**Names of winning team members**

The winning team comprised Mishkat Aham, Nigel Xavier, Preet Kanojia, Md Akdas, Md Asad, Md Moiz Akmal, Ayush Kesari, Md Hanjala, Badal Soren, Md Ashraf, Shubradeep Das, Tejas Chafle, H Raja, Gaurav Sayre, Amol Madankar, S. Ansari, Jamir Shaikh, Ranjoy Banik, Aman Tutti, Md. Noman.

Reserve player- Alex Topo, Md Naseer, Anurag Chande, Chetan Raut, Moin Baig, Priyanshi Sharma, Samvidhan Dahiwale, Emmanuel, Nikhilesh Pedhekar, Tanmay Khande, Geet Hirankhede and Aditya Neware.

---

तरुण भारत
Apla Nagpur | 2024-01-03 | Page- 5
epaper.tarunbharat.net

# नागपूर विद्यापीठाचा फुटबॉल संघ अजिंक्य

पश्चिम विभागीय फुटबॉल स्पर्धा | विजयी चमू ऑल इंडिया विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र

नागपूर, २ जानेवारी

मुंबई येथील एचएसएनसी विद्यापीठाच्या यजमानपदाखाली घेण्यात आलेल्या पुरुष गटाच्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संघाने धडाकेबाज कामगिरी करीत जेतेपद आपल्या नावे केले. याच कामगिरीच्या जोरावर नागपूर विद्यापीठाचा फुटबॉल संघ अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी पात्र ठरला असल्याची माहिती नागपूर विद्यापीठ क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी दिली.

स्पर्धेत जेतेपदासाठी झालेल्या लढतीत नागपूर विद्यापीठाच्या संघाने यजमान मुंबईला ५-४ अशा गोलने मात देत जेतेपद पटकावले. तत्पूर्वी झालेल्या सामन्यात नागपूर विद्यापीठ पुरुष संघाने पहिल्याच लढतीत विजय नोंदवीत दमदार सुरुवात केली होती. या लढतीत नागपूर संघाने गुजरातच्या सरदार पटेल विद्यापीठाचा ३-१ ने पराभव …



स्पर्धेतील विजयी नागपूर विद्यापीठाचा संघ व इतर मान्यवर

… तर बादल सोरेनने एक गोल केला. दुसऱ्या सामन्यात नागपूर विद्यापीठ संघाला पुढे चाल देण्यात आली. तिसऱ्या लढतीत नागपूर संघाने पुण्याच्या डी. वाय. पाटील विद्यापीठाचा ९-० अशा गोलसंख्येने धुव्वा उडविला. स्पर्धेत विजयी संघाच्या मो. ओविस अशरफ, आयुष केसरी, मो. हंझालाने प्रत्येकी दोन गोल, तर प्रीत कनोजिया, सुब्रतो दीपदास व बादल सोरेनने प्रत्येकी एक गोल करीत संघाच्या विजयात मोलाचे योगदान …

टायब्रेकरमध्ये ४-२ अशा गोलने पराभूत केले.

स्पर्धेतील ही कामगिरी पाहता नागपूर विद्यापीठ फुटबॉल संघ पंजाब येथे होणाऱ्या अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. प्रशिक्षक फ्रान्सिस डेव्हिड आणि संघ व्यवस्थापक रॉड्रिक्स अँथोनी यांच्या मार्गदर्शनात विजयी संघाने हे यश प्राप्त केले. विद्यापीठाच्या फुटबॉल संघाच्या कामगिरीबद्दल नागपूर विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी …

---

LOKMAT TIMES

# Bhoomipujan of Advantage Vidarbha venue today

LOKMAT NEWS NETWORK
NAGPUR

Bhoomipujan of the site for Advantage Vidarbha to be organised as a part of Khasdar Audyogik Mahotsav from January 27 to January 29 will be held on January 3 at 11 am.

The biggest industrial and investment conclave Khasdar Audyogik Mahotsav will be held at Jamnalal Bajaj Administrative Building premises Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University.

World Trade Centre are the sponsors of Audyogik Mahotsav and Advantage Vidarbha. while RTMNU is the knowledge partner.

MSME, MIDC and MADC are also providing their expertise for the industry festival.

Audyogik Mahotsav is being organised under he … of Association For In… …al Development (AID). …er major organisations which will take part in the industry conclave included VIA, VED, Laghu Udyog Bharti, BMA, AIA, SMA, Vidarbha Defence Industries Association, VADA, MCDC, Credia, Cosia, FIA, AIREA, VCCI and others.

Meanwhile, president of AID Ashish Kale, vice president of AID Pranav Sharma, Girdhari Mantri, Dr Vijay Sharma, treasurer Prof Rajesh Bagdi, Rajesh Rokde, Nikhil Gadkari, Dr Mahendra Kshirsagar, Pradeep Maheshwari, Prashant Ugemuge and Ravindra Boratkar have also urged the has urged all the stake holders to attend bhoomipujan for the conclave in a large number.

The dignitaries who will attend the Khasdar Audyogik Mahotsav and Advantage Vidarbha will think over ways and means to give filip to the industrial development of Vidarbha in general and also discuss the strenghts and weaknesses of the region.

Nagpur First
Page No. 2 Jan 03, 2024
Powered by: erelego.com

---

# फुले दाम्पत्याने महिलांना ज्ञानपरंपरेशी जोडले

- एकदिवसीय परिसंवादात डॉ. विमल थोरात यांचे गौरवोद्गार

म.टा. प्रतिनिधी, नागपूर

महात्मा जोतिबा फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी १ जानेवारी १८४८ रोजी मुलींसाठी पहिली शाळा सुरू करीत महिलांना ज्ञानाच्या परंपरेशी जोडले. तथागत बुद्धांनी सर्वप्रथम महिला भिक्षूंचा समावेश करून संघाची सुरुवात केली. तिथून सुरू झालेली ही परंपरा फुले दाम्पत्याने पुनरुज्जीवित केली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ती पुढे नेली, असे गौरवोद्गार फुले-आंबेडकरी विचारवंत प्रा.डॉ. विमल थोरात यांनी केले.

फुले दाम्पत्याने १ जानेवारी १८४८ रोजी पहिली महिला शाळा सुरू केली. त्याला सोमवारी १७५ वर्षे पूर्ण झाली. यानिमित्ताने नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास व विचारधारा विभागातर्फे आयोजित एकदिवसीय परिसंवादाच्या उद्घाटन सत्रात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. थोरात बोलत होत्या. अध्यक्षस्थानी आंतरविद्याशाखीय प्रात्यक्षिक अभ्यास शाखेचे डीन डॉ. प्रशांत कडू होते.



परिसंवादात बोलताना प्रा. डॉ. विमल थोरात. मंचावर डॉ. अविनाश फुलझेले आणि डॉ. प्रशांत कडू.

व्यासपीठावर अध्यासन विभागप्रमुख डॉ. अविनाश फुलझेले होते.

डॉ. थोरात म्हणाल्या, मुघल आणि इंग्रजांनी सुमारे एक हजार वर्षे राज्य केले. मात्र, महिलांना शिकवण्याचे धाडस त्यांनी दाखवले नाही. तत्कालीन समाज व्यवस्थेच्या ते विरोधात गेले नाही. कारण त्यांना फक्त इथेच राज्य करायचे होते. महात्मा फुले यांनी केवळ समाजप्रबोधन केले नाही तर ते आपल्या व्यावहारिक कार्यातून दाखवून दिले. फुले दाम्पत्याने अस्पृश्य आणि महिलांसाठी एक नव्हे तर १७ शाळा सुरू केल्या. समाजाची महिलांप्रती असलेली मानसिकता दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी इंग्रजांनी महात्मा फुले यांचा गौरव केला. शेवटी इंग्रजांनाही महिलांसाठी शाळा सुरू कराव्या लागल्या. फुले दाम्पत्य इथेच थांबले नाही, त्यांनी १८५५ मध्ये प्रौढ साक्षरता सुरू केली. विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले. वैधव्यानंतर केस कापण्याच्या प्रथेला विरोध होऊन ते बंद झाले. याविरोधात मोठे आंदोलनही करण्यात आले. या चळवळीचा प्रभाव डॉ. आंबेडकर, पेरियार आणि नारायण गुरु यांच्यावरही पडला आणि त्यांनी तो पुढे नेला.'

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. प्रशांत कडू म्हणाले, महात्मा फुले यांनी वयाच्या अवघ्या १८व्या वर्षी सामाजिक उद्योजकतेला सुरुवात केली. त्यात तरुणांचा समावेश झाल्याशिवाय चळवळ पुढे सरकणार नाही. आता नव्या विचारांच्या शाळा सुरू करण्याची गरज आहे. १ जानेवारी हा दिवस 'संकल्प दिन' म्हणून साजरा केला जाईल.

प्रास्ताविकात डॉ. अविनाश फुलझेले यांनी १ जानेवारी १८४८ या दिनाचे महत्त्व सांगताना फुले दाम्पत्याने सामाजिक-शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्याची माहिती दिली. सूत्रसंचालन भीमराव फुसे यांनी केले, तर आभार दिलीपकुमार लेहगावकर यांनी मानले.

### विविध सत्रांतून मंथन

परिसंवादातील उद्घाटनानंतरच्या पहिल्या सत्रात पीडब्ल्यूएस महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. प्रज्ञा बागडे यांनी प्रमुख वक्त्या म्हणून फुले दाम्पत्याच्या शैक्षणिक वाटचालीवर विवेचन केले. दुसऱ्या सत्रात यशवंत महाविद्यालयातील प्रा. प्रमोद नारायणे यांनी फुले दाम्पत्याच्या सामाजिक चळवळीवर भाष्य केले. समारोपीय सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. गौतम कांबळे, तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. रमेश शंभरकर सहभागी झाले होते.

---

# 'उद्योजकांमध्ये निर्माण होईल नवी चेतना'

- 'खासदार औद्योगिक महोत्सव : ॲडव्हांटेज विदर्भ'चे भूमिपूजन

म. टा. प्रतिनिधी, नागपूर



भूमिपूजनप्रसंगी खासदार रामदास तडस, खासदार अशोक नेते, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, माजी महापौर कल्पना पांडे तसेच इतर मान्यवर.

---

# फुले दाम्पत्याने महिलांना ज्ञानपरंपरेशी जोडले

## डॉ. विमल थोरात : नागपूर विद्यापीठात एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन



विविध सत्रांमध्ये साधला संवाद

---

The Hitavada
Nagpur City Line | 2024-01-04 | Page-5
ehitavada.com

# RTMNU's Home Science PGTD expo brings 'Millets for Life: Nutritional Delights across Lifespan'

Millets-2023 exhibition



Dr Sharad Nimbalkar inaugurating the exhibition. Dr Sanjay Dudhe, Dr Kalpana Jadhav and others look on.

Powered by iDocuments

---

नवभारत

'खासदार औद्योगिक महोत्सव–एडवांटेज विदर्भ' आयोजन स्थल का भूमिपूजन

# गडकरी ने दी नये वर्ष में नई दिशा



इनकी रही उपस्थिति

Nagpur Edition
04-january-2024 Page No. 4

---

पुण्यनगरी

# आदर्श भुरेने जिंकले रौप्यपदक

अ. भा. आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धा

पुण्य नगरी / प्रतिनिधी



… झालेली १०० मीटर दौड आदर्श भुरेने १०.८० सेकंदात पूर्ण करीत रौप्यपदक जिंकले. भारतीदासन विद्यापीठाच्या साई सिद्धार्थने स्पर्धा १०.७७ सेकंदात पूर्ण करीत सुवर्णपदक, तर मद्रास विद्यापीठाच्या तमिलारासुने स्पर्धा १०.९३ सेकंदात पूर्ण करीत कांस्यपदक जिंकले. पुरुषांची १५०० मीटर दौड स्तुम नागपूर विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सौरव तिवारीने ३ मिनिटे ५३.७७ सेकंदात पूर्ण करीत तो नवव्या स्थानी राहिला. सौरवसुद्धा खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला. अ. भा. आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेत पदकविजेत्या आदर्श भुरेचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र- कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, क्रीडा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, डॉ. आदित्य सोनी, डॉ. जयकुमार क्षीरसागर, वरिष्ठ प्रशिक्षक भाऊ काणे, धनंजय काणे यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

Smart Nagpur Edition
Jan 5, 2024 Page No. 02
Powered by : eReleGo.com

---

# … conducts study on region's ancient sites



RTMNU VC Dr Subhash Chaudhari observes the ancient rock models on display with the HOD Prabhas Sahu.

LOKMAT NEWS NETWORK
NAGPUR

The Department of Ancient Indian History, Culture, and Archeology collaborated with the Nagpur Circle of the Archeological Survey of India to conduct a comprehensive study on the ancient archaeological sites in the Nagpur region.

This collaboration aims to explore and document the rich cultural heritage of this area, shedding light on its historical significance and providing valuable insights into ancient Indian civilization. The research involves excavations, surveys and analysis of artifacts to piece together the story of this region's past and contribute to our understanding of India's ancient history. Nagpur University Vice Chancellor Dr Subhash Chaudhari officially opened the two-day event. The HOD of the department, Dr Prabhas Sahu, faculty members and students were present for the inauguration ceremony. Human evolution was showcased as one of the key themes of the event, highlighting the evolutionary journey of early humans in this region.

The exhibition featured fossil remains, tools and other archaeological findings that offer a glimpse into the lives and development of our ancestors. Pre-historic sites in Vidrabha were also highlighted, showcasing the rich archaeological heritage of the region. Students of the department presented their research findings, shedding light on the culture of ancient Indian civilisations. In addition, pre-historic flora and fauna was also displayed, providing insight into the ecosystem that existed during that time period, showcasing not only the human aspect but also the natural environment in which they thrived.

The rock art of Maharashtra was another fascinating aspect that was explored during the event. These ancient paintings on cave walls depicted various aspects of daily life, religious beliefs, and even the flora and fauna of the region. The vibrant colours of rocks were painted using natural colours, providing a glimpse into the artistic skills of ancient Indians. All of antiquity were displayed on charts, banners, and models, and some were gathered by visiting ancient sites near Nagpur.

Nagpur First
Page No. 4 Jan 04, 2024

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. यावेळी सामान्य प्रशासन विभागातील युडीसी शैलेश राठोड, योगेश केवटे, मनोज मोरे, रुपेश आतराम, नरेंद्र पवार, आसिफ शेख, प्रदीप झोडे, शीतल शेटे उपस्थित होते.

---

The Hitavada
Nagpur City Line | 2024-01-04 | Page- 2
ehitavada.com

## RTMNU are soccer champs

■ Sports Reporter

RASHTRASANT Tukadoji Maharaj Nagpur University (RTMNU) won the West-Zone Inter University Football Tournament organised by HSNC University in Mumbai.

In the summit clash, RTMNU boys managed a close 5-4 win over hosts to win the title. By virtue of being champs, RTMNU team has qualified for the All India Inter-University Football Tournament to be held in Punjab, informed Dr Sharad Suryawanshi, Director of Sports and Physical Education, RTMNU.

Enroute to the final, RTMNU men defeated Sardar Patel University of Gujarat 3-1. Mohammed Owais Ashraf scored two goals while Badal Soren scored one.

In second match, RTMNU team was given a walk over. In third match, RTMNU thrashed DY Patil University, Pune 9-0. Later Nagpur defeated Goa 4-2 via tie-breaker.

The winning team: Mishkat Aham, Nigel Xavier, Preet Kanojia, Md Akdas, Md Asad, Md Moiz Akmal, Ayush Kesari, Md Hanzala, Badal Soren, Md Ashraf, Shubradeep Das, Tejas Chafle, H Raja, Gaurav Sayre, Amol Madankar, S Ansari, Jamil Shaikh, Ranjoy Banik, Aman Tuti, Md Noman.

Francis David was coach of the team while Rodrique Anthony accompanied as manager.

Vice-Chancellor Dr Subhash Chaudhary, Pro Vice-Chancellor Dr Sanjay Dudhe, Registrar Dr Raju Hiwse and Suryawanshi congratulated the team.



---

नवभारत

## लॉ कालेज में पूर्व छात्रों का सम्मेलन
### शताब्दी वर्ष को यादगार बनाने जुट जाएं



नागपुर, महनगर संवाददाता. नागपुर विश्वविद्यालय द्वारा संचालित बाबासाहब आंबेडकर विधि महाविद्यालय में पूर्व छात्रों का सम्मेलन आयोजित किया गया. इसमें कॉलेज के पूर्व प्राचार्य सहित अन्य विद्यार्थियों ने हिस्सा लिया. पूर्व छात्र संगठन अध्यक्ष डॉ. रविशंकर मोर का सत्कार किया गया. समारोह में 2001 से 2006 के बी.ए.एल.एल.बी. 5 वर्षीय पाठ्यक्रम बैच के 75 विद्यार्थी उपस्थित थे. इनमें कई न्यायाधीश, वकील तो कुछ सामाजिक कार्यकर्ता के रूप में कार्य कर रहे हैं. उपस्थितों में न्यायाधीश आनंद बोरकर, न्यायाधीश स्वाती उपाध्ये, सामाजिक कार्यकर्ता कीर्ती सावले, प्रा. जय भोंगाडे, स्पेशल पब्लिक प्रॉसीक्यूटर आकाश मुन, एड. अशफाक शेख, एड. सिंह आदि ने हिस्सा लिया. इस अवसर पर प्रा. रविशंकर मोर ने कहा कि प्रत्येक के जीवन में मां-पिता के साथ ही शिक्षा संस्थान का भी योगदान होता है. अपने महाविद्यालय के लिए जो कुछ भी संभव हो, वह किया जाना चाहिए. 2025 में महाविद्यालय 100 वर्ष पूर्ण करेगा. इस उपलक्ष्य में विविध कार्यक्रमों का आयोजन किया जाएगा. इन क्षणों को यादगार बनाने के लिए सभी से एकत्रित होने की अपील की गई है.

Nagpur Edition
04-january-2024 Page No. 2
epaper.enavabharat.com

---

## डॉ. इंगळेंची जहांगीर आर्ट गॅलरीत चित्रप्रदर्शनी
### उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

■ सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. ३ : यवतमाळ जिल्ह्यातील बोरी अरब येथील मूळ रहिवासी व नागपूरच्या शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. किशोर इंगळे यांचे 'प्रिमॉर्डिअल नेचर' चित्र प्रदर्शनी मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरीत सुरू झाले आहे. मंगळवारी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते या प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले. प्रत्येक माणसाच्या मनात अमूर्त काहीतरी सुरू असतं. ते रेखाटण्याचा प्रयत्न किशोर इंगळे यांनी उत्तमरीत्या केला असल्याचे मत चंद्रकांत पाटील यांनी यावेळी व्यक्त केले.

डॉ. इंगळे यांचे अमूर्त चित्रांचे प्रदर्शन 'प्रिमॉर्डिअल नेचर' हे मुंबई येथील प्रसिद्ध जहांगीर आर्ट गॅलरी येथे मंगळवारपासून सुरू झाले आहे. इंगळे यांचे हे जहांगीर आर्ट गॅलरी मधील सहावे चित्रप्रदर्शन आहे.

याशिवाय त्यांनी आपल्या चित्राचे प्रदर्शन दिल्ली, मुंबई, बंगलोर, भोपाळ, लखनौ, नागपूर तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर लंडन, अमेरिका, कोरिया, शिकागो येथे प्रदर्शित केले आहे. या प्रदर्शनातील आपल्या अमूर्त चित्रांमध्येही विचारांचा खुलेपणा आणला आहे. मानवी स्वभाव व आध्यात्मिकता यांच्या सूक्ष्म धाग्यांचीही गुंफण केली आहे.

किशोर इंगळे यांनी 'ग्राफिटी आर्ट' या विषयावर पीएच.डी केली असून ते नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य आहे. सदर प्रदर्शन ८ जानेवारी पर्यंत सर्वांसाठी खुले असणार आहे. अमूर्त अभिव्यक्तीच्या परंपरेशी आपले दृढ नाते सांगणारे हे चित्रप्रदर्शन आहे. उद्घाटन प्रसंगी त्यांची पत्नी सोनाली इंगळे उपस्थित होत्या.



मुंबई : मंत्री चंद्रकांत पाटील यांचे स्वागत करताना प्रा. डॉ. इंगळे व इतर.

---

लोकमत

## रोहतक विद्यापीठाने पटकावला कुलगुरू चषक
### टी-२० कुलगुरू चषक क्रिकेट स्पर्धा



टी-२० कुलगुरू चषक क्रिकेट स्पर्धेतील विजेता रोहतक विद्यापीठाचा संघ.

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : अखिल भारतीय विद्यापीठ कर्मचारी टी-२० क्रिकेट स्पर्धेचा कुलगुरू चषक महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक संघाने जिंकला. एमडीयू रोहतक संघाने अंतिम लढतीत जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ, दिल्ली संघाचा ५ विकेटने पराभव केला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षाच्या अनुषंगाने कुलगुरू चषक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

एस. बी. सीटी महाविद्यालय, सक्करदरा येथील क्रिकेट मैदानावर अंतिम सामना शनिवारी पार पडला. प्रथम फलंदाजी करीत जामिया मिलिया इस्लामिया संघाने २० षटकांत ९ बाद १६१ धावा काढल्या. सलामीवीर मोहम्मद युसुफ यांनी ३२, मोहम्मद आकीब यांनी ३५ धावा काढत संघाला चांगली सुरुवात करून दिली. आदिल यांनी ३७ व वाहिद यांनी १४ धावा काढल्या. रोहतक संघाचे रणबीर राणा यांनी ३ बळी घेतले. नरेंद्र शिलक यांनी २ तर दीपक कुमार व पंकज नैन यांनी प्रत्येकी १ बळी टिपला. १६१ धावांचा पाठलाग करताना रोहतक संघाची सुरुवात खराब झाली. सलामी वीर नरेंद्र शिलक शून्यावर बाद झाला. मात्र, विपीन सैनी याच्या ९८, राज कुमार ७४, गौरव धुरेजा ३७ व दीपक कुमार याच्या १४ धावांच्या मदतीने रोहतक संघाने १८.४ षटकांत ५ बाद १६५ धावा काढत कुलगुरू चषक जिंकला.

**नरेंद्र शिलक चषकवीर**

- महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक या विजेता संघाला कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या हस्ते कुलगुरू चषक प्रदान करण्यात आला.
- द्वितीय स्थान पटकावणाऱ्या जामिया मिलिया इस्लामिया संघ तसेच तिसरे स्थान पटकावणाऱ्या लाला लजपत राय पशुचिकित्सा व पशुविज्ञान विद्यापीठ, हिसार संघालाही चषक देऊन सत्कार करण्यात आला.
- चषकवीर व उत्कृष्ट फलंदाज म्हणून संघाचे नरेंद्र शिलक, उत्कृष्ट गोलंदाज म्हणून जम्मू विद्यापीठाचे राजकुमार बक्षी यांचा सत्कार करण्यात आला.

Nagpur Main
Page No. 6 Jan 07, 2024
Powered by: erelego.com

---

देशोन्नती

## रातुम विद्यापीठ फूटबॉल संघ ऑल इंडिया स्पर्धेसाठी पात्र

पश्चिम विभागीय फुटबॉल स्पर्धा


